




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २४० * नांदेड * मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## नांदेडमध्ये डीजे, डॉल्बीवर बंदी; एसपींच्या निर्णयावर जिल्हाधिकाऱ्यांची मोहोर

### बीएनएसएस १६३ लागू, थेट गुन्हे दाखल होणार -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) अन्वये डॉल्बी सिस्टीमवर बंदी घातली आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी दहीहंडी, १४ सप्टेंबर रोजी श्री गणेश स्थापना आणि २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होणार आहेत. या मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीमच्या कर्णकर्कश आवाजामुळे वयोवृद्ध, गरोदर महिला, लहान मुले आणि रुग्णांना मोठा त्रास होतो. पर्यावरण कायद्यानुसार नोटीस देऊन, बैठका घेऊन समुपदेशन करूनही डॉल्बी मालकांकडून दरवर्षी शिवजयंती, आंबेडकर जयंती, रामनवमी, गणेशोत्सव, नवरात्रमध्ये कायद्याचे उल्लंघन केले जाते.




मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. १५२/२०१० मधील आदेशानुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करताना आतापर्यंत जिल्ह्यात ३९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आगामी जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डॉल्बीवरून तणाव व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी केलेल्या विनंतीनुसार जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दि. ७ सप्टेंबर २०२६ पहाटे एकपासून ते दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात डॉल्बी मालक, चालक व इतर कोणत्याही व्यक्तीस डॉल्बी सिस्टीम वापरण्यास व चालविण्यास प्रतिबंध केला आहे. वेळेअभावी बीएनएसएस कलम १६३(२) अन्वये हा एकतर्फी आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

## नांदेड जिल्ह्यात 'कुणबी प्रमाणपत्रा'साठी महसूल मंडळ स्तरावर १० ते १७ सप्टेंबर दरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणे सुलभ व्हावे, यासाठी १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने या विशेष मोहिमेचे नियोजन केले आहे. या मोहिमेत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

या विशेष मोहिमेअंतर्गत प्रत्येक महसूल मंडळात संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. शिबिराचा दिनांक, वेळ व ठिकाण याची माहिती नागरिकांना वेळेत मिळावी, यासाठी गावपातळीवर दवंडी देणे, ग्रामपंचायतीच्या नोटीस फलकावर सूचना प्रसिद्ध करणे तसेच स्थानिक व्हॉट्सप समूहांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विशेष शिबिरांमध्ये जुन्या कुणबी नोंदी शोधणे, नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी करणे, नवीन अर्ज स्वीकारणे, आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करणे तसेच परिपूर्ण अर्ज भरण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन करणे, याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. पात्र नागरिकांना प्रमाणपत्र जलदगतीने मिळावे, यासाठी आवश्यक पाठपुरावाही करण्यात येणार आहे.

शिबिरांच्या कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता राखण्यासाठी उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांची जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिबिरांच्या कामकाजाचे दैनिक संनियंत्रण करण्यात येणार आहे.

ही मोहीम शासनाच्या सर्वोच्च प्राधान्याची बाब असून, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी आपल्या स्तरावर तात्काळ सूक्ष्म नियोजन करून आदेशाची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी आपल्या क्षेत्रातील महसूल मंडळ स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष शिबिरांना भेट देऊन या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**संयुक्त पथकांद्वारे आयोजन:** प्रत्येक महसूल मंडळात संबंधित तलाठी, ग्रामसेवक व मंडळ अधिकारी हे संयुक्तपणे या शिबिरांचे आयोजन करतील.

**पूर्वप्रसिद्धी व जनजागृती:** शिबिराचा दिनांक, वेळ आणि ठिकाण याची माहिती नागरिकांना आधीच मिळावी यासाठी गावपातळीवर दवंडी देणे, ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर सूचना लावणे आणि स्थानिक व्हॉट्सप ग्रुप्सच्या माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**जागीच पडताळणी व जलद वाटप :** या शिबिरांमध्ये प्रामुख्याने जुन्या कुणबी नोंदी शोधणे, **(पान ५ वर...)**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत

**मुंबई (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) एक दिवसीय मुंबई दौऱ्यावर येत असून, त्यांच्या हस्ते जगातील सर्वात मोठ्या 'ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६'चे उद्घाटन होणार आहे. या जागतिक वित्तीय तंत्रज्ञान महोत्सवात ते उपस्थितांना विशेष मार्गदर्शनही करणार आहेत. सायंकाळी ५:४५ वाजता ते या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. पंतप्रधानांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईत आणि विमानतळ परिसरात चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

## १२ सप्टेंबरला मराठ्यांची ताकद दाखवा -मनोज जरांगे

**जालना (प्रतिनिधी)–** सरकार मुद्दाम आणि जाणीवपूर्वक हयगय, हलगर्जीपणा करत आहे. परिणामी आता मराठ्यांचा रोष वाढत आहे. मराठा संपवण्यासाठी डाव आखत आहे. आता आपण सरकारला १२ तारखेपर्यंतचा वेळ दिला आहे. १२ तारखेला मुंबईत जाण्याचा निर्णय होईल, त्यादिवशी मराठ्यांची ताकद दाखवा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले.

दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे आणि त्यांच्या माणसाचे पण तेच चालू आहे. पण मुंबईत जाताना पोलिसांनी हल्लाच केला तर पळू नका, त्याने चेंगराचेंगरी होते. बंदूक काही करत नाही. पोरांनी धरली तर त्यांना वळवळ करता येणार नाही. फक्त मुंबईत दबा धरा. पावनखिंडीत दबा मावळ्यांनी धरला होता. स्वसंरक्षणासाठी दबा धरा. गेम तर वाजला पाहिजे आणि दिसलाही नाही पाहिजे, असेही मनोज जरांगे म्हणाले.

अजितदादांचं काय झालं, कोणालाच त्याचा मेळ नाही. किती दिवस रिपोर्ट येणार, तपास लागणार आहे, असे सांगितले जातेय. किती दिवस नीच औलादीसारखं जगताय रे कार्यकर्त्यांनो तुम्ही. सोन्यासारखा तुमचा माणूस गेला. समजून घ्या, राजकारणापलीकडे जाऊन



अजितदादांबाबत काय झालं असेल. असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

तर देवेंद्र फडणवीस यांच्यावर जरांगे यांनी गंभीर आरोपही यावेळी केले. मुख्यमंत्र्यांनी सांगितले म्हणून विश्वास ठेवला. फक्त सातारा, कोल्हापूरमध्ये दोन महिने थांबा म्हणले. मी त्यांना भाऊ म्हटले. मी बोलत नव्हतो. पण बोललो. त्यांना बोला भाऊ म्हटले. मी त्यांना म्हटलंय मला राजकारणाच देणे-घेणे नाही. सरकार गोड बोलून पायाखाली घालतो. एकनाथ खडसे, गोपीनाथ मुंडे, महाजनांचे घर याने पायाखाली घातले. निलंगेकरचे घर पायाखाली घातलं ही याची स्टाईल. तावडेचेही घर पायाखाली, गडकरीचे घर पायाखाली. मी शेकडो उदाहरण देतो. नारायण राणे साहेबांचे, अशोकराव चव्हाण, विखे साहेबांचे घर पायाखाली घातलं, राजगादीचे सगळे राजे चिडचूप बसलेत. कोल्हापूर आणि साताऱ्याच्या गादीची एवढी वाईट वेळ येऊ नये. असे म्हणत मोठे गंभीर आरोपही त्यांनी केली आहे.

## धनगर एसटी आरक्षणासाठी पडळकरांच्या नेतृत्वात हजारो समाजबांधव रस्त्यावर, मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाच्या अंमलबजावणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी आंदोलनाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात एसटी आरक्षणाबाबत ८ सप्टेंबरपूर्वी राज्य शासनाने



धनगर समाजाच्या बाजूने ठाम भूमिका घ्यावी, सक्षम विधी पथक नियुक्त करून ऐतिहासिक व शासकीय पुरावे सादर करावेत आणि भविष्यातील कायदेशीर लढ्यासाठी ठोस प्लान-बी तयार ठेवावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री, अधिकारी, कायदेतज्ज्ञ आणि समाज प्रतिनिधींची **(पान ५ वर...)**

## तिर्थक्षेत्र काळेश्वर येथे चौथ्या श्रावण सोमवारी भाविकांची गर्दी

### गोदावरी पात्रात गंगास्नान, महाअभिषेक व महाआरतीने परिसर भक्तिमय



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** पंचक्रोशीतील तसेच नांदेड तालुक्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपूरी येथे श्रावण मासातील चौथ्या सोमवारी हजारो भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली. याप्रसंगी भाविकांनी गोदावरी नदीत गंगास्नान करून, महादेवाचा गजर करत 'जय काळेश्वर भगवान की जय', 'बम बोले' आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात दर्शनाचा लाभ घेतला.

सोमवारी रात्री १ वाजता महाअभिषेक, तर सायंकाळी गोदावरी माता व काळेश्वर भगवंताची महाआरती आयोजित करण्यात आली होती. पहाटेपासूनच हजारो भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात रांगा लावल्या होत्या.

विशेष व्यवस्था व कडक बंदोबस्त काळेश्वर मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने श्रावणी सोमवारी होणारी गर्दी लक्षात घेता भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली दोन पोलीस निरीक्षक, ११ सहाय्यक पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक, ९० पोलीस अंमलदार व महिला पोलीस कर्मचारी तसेच ६५ होमगार्डचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गोदावरी नदीच्या पात्रात सुरक्षिततेसाठी जीवरक्षक दलही सज्ज ठेवण्यात आले होते.

पुजारी रामेश्वर लिंगप्पा धनमणे स्वामी, **(पान ५ वर...)**

## नायगाव येथे गॅस वितरणातील विलंबाने नागरिक त्रस्त

### गॅसचे टोकन घेऊनही दोन-तीन दिवस प्रतीक्षा; अतिरिक्त फेऱ्यांमुळे नागरिक संतप्त!

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** नायगाव येथील शगुन गॅस वितरण केंद्राच्या कारभाराबाबत स्थानिक ग्राहकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना विविध ठिकाणी फेऱ्या माराव्या लागत असून, टोकन घेतल्यानंतरही दोन ते तीन दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याचे काही ग्राहकांचे म्हणणे आहे. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी आणि कामगार वर्गाला मनस्ताप सहन करावा लागत आहे.


घरपोच वितरण सेवा नियमित मिळत नसल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. गोडाऊनवरून गॅस सिलेंडर स्वतः घेऊन जावे लागत असतानाही पूर्ण शुल्क आकारले जात असल्याचा दावा काही ग्राहकांनी केला आहे. तसेच, गॅस वितरणाच्या ठिकाणांबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने ग्राहकांना विविध ठिकाणी चकरा माराव्या लागत आहेत. शेतातील कामे सोडून सिलेंडरसाठी चकरा माराव्या लागत असल्याने शेतकरी वर्गातूनही या अडचणींवर लवकरात लवकर तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

एकीकडे मुख्य वितरकाकडून सिलेंडर मिळण्यास वेळ लागत असताना, काही स्थानिक विक्री केंद्रांवर अतिरिक्त दर आकारून तत्काळ गॅस उपलब्ध करून दिला जात असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. ग्राहकांना वेळेवर सिलेंडर न मिळता हा साठा इतरत्र वळवला जात आहे का, असा प्रश्न उपस्थित करत गॅस वितरण व्यवस्थेत पूर्ण पारदर्शकता असावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

सोमवारी काही ग्राहकांनी गॅस एजन्सीच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून या परिस्थितीबाबत चर्चा केली व आपल्या समस्या मांडल्या. गॅस सिलेंडरचे योग्य व वेळेत वितरण, घरपोच सेवेची अंमलबजावणी, आकारले जाणारे शुल्क आणि वितरणातील विलंब या सर्व बाबींची नायगाव तहसील प्रशासन व पुरवठा विभागाने सखोल पाहणी करावी. प्रशासनाने या संपूर्ण वितरण व्यवस्थेचा आढावा घेऊन नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडून केली जात आहे.

## भारतासाठी १.१० लाख कोटींच्या लष्करी उपकरणांच्या खरेदीला मंजुरी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारत आपली हवाई सुरक्षा यंत्रणा आणखी मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. पूर्वी भारताला सर्वाधिक शस्त्रांची आयात करणारा देश म्हणून ओळखलं जायचं. मात्र, आता हे चित्र काहीसं बदलत आहे. दरम्यान, आता भारताच्या संरक्षण मंत्रालयाने तिन्ही सैन्य दलांसाठी तब्बल १.१० लाख कोटींच्या लष्करी उपकरणांच्या खरेदीला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता भारतीय सैन्यदलाला आणखी बळ मिळणार आहे. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण संपादन परिषदेची (डीएसी) एक महत्वाची बैठक पार पडली आहे.





**नांदेड :** गोकुळ अष्टमीनिमित्त यशवंत कॉलेज मैदानावर भाजप युवा मोर्चा व डॉ. आशुतोष अमरनाथ राजूरकर यांच्यावतीने सार्वजनिक दहिहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, बिग बॉस फेम एल्विश यादव, आकांक्षा चौधरी यांच्या उपस्थितीत दहिहंडी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आ. अमरनाथ राजूरकर, आ. राजेश पवार, महापौर कविता मुळे, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, भाजप जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, भाजप प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, माजी नगरसेवक महेंद्र पिंपळे आदी मान्यवर दिसत आहेत. यावेळी तरूणाईने मोठ्या संख्येने गर्दी केली होती. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## जुन्या वादातून धारदार शस्त्राच्या हल्ल्यात जखमी झालेल्या तरूणाचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिंचननगर परिसरात बुद्ध विहाराजवळ जुन्या भांडणाच्या कारणावरून एका तरुणावर प्राणघातक हल्ला झाला. त्यानंतर उपचारादरम्यान त्या तरूणाचा मृत्यू झाला आहे. प्रतीक ससाणे असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ सप्टेंबर रोजी प्रतीक बुद्ध विहाराजवळ असताना जुन्या वादातून मयूर लोणे (रा. झेंडा चौक) आणि एका अल्पवयीन मुलाने त्याच्यावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. या हल्लयात प्रतीक गंभीर जखमी झाला होता.

घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेऊन जखमीला शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्याच दिवशी पोलिसांनी दोन्ही हल्लेखोरांना अटक केली होती. अटक केलेल्या आरोपीपैकी एक अल्पवयीन असल्याने त्याला निरीक्षणगृहात तर एकाला पोलीस कोठडीत पाठवले आहे. उपचारादरम्यान प्रतीकचा मृत्यू झाल्याने या प्रकरणी आता खुनाची कलम वाढविण्यात आली आहे. विशेष म्हणजे मयत आणि आरोपी विरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे यापूर्वी दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# कार्डांचा वाढता पसारा: सुविधा की त्रास?

आजच्या डिजिटल युगात प्रत्येक व्यवहार अधिक सोपा, सुरक्षित आणि कागदविरहित करण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या खिशात आणि पाकिटात कार्डांची संख्या इतकी वाढली आहे की, 'डिजिटल सुविधा' म्हणायची की 'कार्डांचा पसारा', असा प्रश्न पडावा. एसटी महामंडळाने सवलतीच्या प्रवासासाठी ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना स्मार्ट कार्ड अनिवार्य केल्याच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यातच १९९ रुपयांच्या कार्डासाठी प्रत्यक्षात २३० किंवा रांगेत न उभे राहता तब्बल ३०० रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. कार्ड अनिवार्य करणे ही बाब स्वतःमध्ये चुकीची नाही. सवलतींचा गैरवापर रोखण्यासाठी, प्रवाशांची ओळख निश्चित करण्यासाठी आणि प्रवास व्यवस्था अधिक पारदर्शक करण्यासाठी स्मार्ट कार्डसारख्या तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ शकतो. पण सुविधेच्या नावाखाली नागरिकांच्या अडचणी आणि आर्थिक भार वाढत असेल, तर त्या व्यवस्थेचा फेरविचार करणे आवश्यक आहे. आज एका सामान्य नागरिकाकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, एटीएम किंवा डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, आरोग्यविषयक कार्ड, विमा कार्ड, विविध सरकारी योजनांची कार्डे आणि आता वेगवेगळ्या सेवांसाठी स्मार्ट कार्डे अशी अनेक कार्डे असतात. प्रत्येक कार्डाचे स्वतंत्र महत्त्व आहे. परिणामी, पाकीट जाड होते, कार्ड सांभाळण्याची जबाबदारी वाढते आणि एखादे कार्ड हरवले तर त्याच्या गैरवापराची भीती निर्माण होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांचा विचार केला तर ही समस्या अधिक गंभीर आहे. एका बाजूला त्यांना सवलत देण्याचा निर्णय घेतला जातो आणि दुसऱ्या बाजूला त्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी स्वतंत्र कार्ड काढण्याची सक्ती केली जाते. म्हणजेच, सवलत मिळवण्यासाठी आधी खर्च करा आणि नंतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करा, अशी विचित्र परिस्थिती निर्माण होऊ नये. मुळात सरकार आणि विविध महामंडळांनी 'एक नागरिक एक डिजिटल ओळख' या संकल्पनेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आधार किंवा इतर अधिकृत डिजिटल ओळखीच्या माध्यमातून नागरिकाची पात्रता पडताळता येत असेल, तर प्रत्येक सेवेसाठी स्वतंत्र कार्ड कशासाठी? मोबाईल फोनमध्ये डिजिटल ओळख, क्यूआर कोड किंवा एकत्रित डिजिटल वॉलेटच्या माध्यमातून अनेक सेवा उपलब्ध करून देता येतील. त्यामुळे नागरिकांना प्रत्येक वेळी कार्डांचा गठ्ठा घेऊन फिरण्याची गरज उरणार नाही. एसटीच्या स्मार्ट कार्डच्या बाबतीत तर आणखी एक मूलभूत प्रश्न आहे. तो म्हणजे कार्ड अनिवार्य करण्यापूर्वी त्याची उपलब्धता, किंमत आणि प्रक्रिया पारदर्शक का केली गेली नाही? महामंडळ १९९ रुपये किंमत सांगत असेल आणि प्रवाशांकडून २३० अथवा ३०० रुपये घेतले जात असतील, तर या फरकाचे स्पष्टीकरण कोण देणार? रांगेत उभे राहण्याची गरज नसल्याच्या नावाखाली अतिरिक्त पैसे घेण्याचा प्रकार असेल, तर तो नागरिकांच्या असहायतेचा गैरफायदा घेण्यासारखाच आहे. अशा तक्रारींची तातडीने चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे.तंत्रज्ञानाचा उद्देश माणसाचे जीवन सोपे करणे हा असतो; माणसाला तंत्रज्ञानाच्या प्रक्रियेत अडकवणे हा नव्हे. प्रत्येक नवीन योजनेसोबत नवीन कार्ड देण्याऐवजी उपलब्ध डिजिटल ओळख प्रणालींचा एकत्रित वापर करण्याची वेळ आली आहे. एसटी महामंडळाने स्मार्ट कार्ड योजना राबवावी; पण ती सोप्या, पारदर्शक, कमी खर्चिक आणि पर्यायी डिजिटल सुविधांसह असावी. ज्येष्ठ नागरिकांना सवलत देताना त्यांना रांगा, अतिरिक्त शुल्क आणि किचकट प्रक्रिया यांचा त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. शेवटी प्रश्न केवळ रुपयांचा नाही. प्रश्न आहे तो नागरिकांच्या सोयीचा आणि प्रशासनाच्या दृष्टिकोनाचा. सरकारने नागरिकांना कार्डे देत राहण्यापेक्षा त्यांच्या खिशातील कार्डांची संख्या कमी करण्याचा विचार केला पाहिजे. कारण डिजिटल भारताची खरी ओळख ही नागरिकाच्या पाकिटात किती कार्डे आहेत यावर नव्हे, तर एकाच ओळखीने त्याला किती सेवा सहज उपलब्ध होतात यावर ठरणार

# संत सेना महाराज: मराठीपलीकडील महान कवी भक्त



महाराष्ट्र आपल्या नावाप्रमाणेच महान राष्ट्र आहे! अखंड भारतवर्षाच्या विविध क्षेत्रातील क्रांतीची बिजं महाराष्ट्राच्या मातीनं दिली आहेत हे नाकारून कसे चालेल? महाराष्ट्र क्रांतिकारी इतिहास जगाला दिशादर्शक आहे. त्या कार्यात वारकरी संप्रदायाचा सिंहाचा वाटा आहे हे कुणीच नाकारू शकत नाही. मागील आठवड्यात जेष्ठ लेखक श्री उत्तम कांबळे (नाशिक) सरांसोबत लेखन संदर्भात फोनवर चर्चा झाली तेंव्हा, क्रांतिकारी समता, भजन, भक्ती आणि ममतेनेयुक्त असलेला वारकरी संप्रदाय महाराष्ट्रातून वजा केल्यास महाराष्ट्र हा डोकं, हात, पाय नसलेला केवळ भूप्रदेश राहील असं जेंव्हा कांबळे सर बोलले तेंव्हा मला आपण स्वतः वारकरी असल्याचा अभिमान वाटला. वारकरी संप्रदायाचा इतिहास प्राचीन असला तरी संत नामदेवांच्या कालखंडापासून तो लेखन, भजन आणि कीर्तन प्रबोधन मार्गातून लोकाभिमुख झाला. मुळात वारकरी संप्रदाय हा इथल्या कर्मठ, उर्मट, अमानुष, भेदभावजन्य वर्णव्यवस्थेने नाकारलेल्या लोकांनी एकत्र येऊन भजन, भक्ती, लेखन मार्गाने उभी केलेली एक स्वतंत्र क्रांतिकारी चळवळ आहे. त्यात अठरापगड जातीतील स्त्री-पुरुष पंढरीच्या वाळवंटात भजन-कीर्तन भक्तीसाठी एकत्र येऊन मंदिराबाहेर श्री विठ्ठल अस्तित्व उभे करतात. मगच लोकांच्यात प्रत्यक्ष श्रीविठ्ठल येऊन नाचतो. असा हा अद्वैत अर्थात देव-भक्त एकच मानणारा, असणारा वारकरी संप्रदाय नित्य प्रेरणादायी आहे.

वारकरी संप्रदाय केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. तीर्थयात्रेच्या माध्यमातून नामदेव-ज्ञानदेव यांनी वारकरी समता-ममतेचा विचार भारतभर प्रसारित केला. वारकरी संप्रदायात जात, धर्म, पंथ, लिंग, उच्चनीच असा भेदभाव नव्हता. प्रत्येकजण तेव्हढाच अधिकारी, परिणामी आजही सर्वजण मोठ्या प्रेमाने एकमेकाच्या पाया पडतात. ही फार मोठी समतेची क्रांती वारकऱ्यानी रुजवली. त्यात संत नामदेवांच्या वारकरी प्रभावळीत संत सावतोबा, संत चोखोबा, संत गोरोबा, संत कान्होबा, संत परिसा, संत ज्ञानदेव, संत जनाबाई, संत सोयराबाई आदि सर्वच स्तरातून आलेली आणि मुळात वारकरी धर्म मानणारी मंडळी होती. असा समतेचा देव असणारा श्रीविठ्ठल या सर्वांना अक्षरशः अंगाखांद्यावर घेऊन नाचायचा. आपल्या भक्तांना जेऊ घालायचा आणि मग जेवायचा! असा आमचा श्री विठ्ठल! अशी देव-भक्तांची प्रेमभक्ती सर्वश्रुत झाली. हा समता, ममतेचा अलौकिक प्रेमाविष्कार थेट मध्यप्रदेशच्या बांधवगड पर्यंत जाऊन पोहोचला!

मध्यप्रदेश, बांधवगड येथे परम विठ्ठलभक्त संत सेना महाराज वास्तव्यास होते. तेराव्या शतकातील संत सेना महाराजांच्या जन्म तारखेचा आणि परिवाराचा कोणताही ठोस पुरावा हाती लागत नाही. असे असले तरी संत नामदेवांची समते-ममतेची श्री विठ्ठल भक्ती संत सेना महाराजांना आकर्षित करून गेली. संत सेना महाराज हे निस्सीम श्रीविठ्ठल भक्त. त्यांच्या जीवन आणि व्यवसाय संदर्भात अनेक मिथक आजही सर्वश्रुत आहेत. बादशहाच्या दरबारी सेवा देण्याचे काम ते करत असताना एके दिवशी श्री विठ्ठल भजनामध्ये संत सेना महाराज दंग झाले आणि तिकडे बादशहाच्या दाढी, कटिंग, मालिश करण्याचा वेळ होऊन गेला. बादशहा संतप्त झाला. तेवढ्यात बादशहाकडे आपल्या सामानासह सेना महाराज हजर झाले. दाढी, कटिंग, मालिश करून सेना महाराज निघून गेले. तिकडे भजन भक्तीत दंग झालेल्या सेना महाराजांना बादशहाच्या मालिश-कटिंगच्या वेळेची आठवण झाली आणि सेना महाराज धावतच राजवाड्याकडे आले. तोपर्यंत बादशहाला सेना महाराजांच्या रूपामध्ये श्रीविठ्ठल दर्शन झाल्यामुळे त्या गोड रूपाने बादशाह अक्षरशः वेडा झाला होता. तेवढ्यातच संत सेना समोर पाहून बादशहा अक्षरशः त्यांच्या पायावर लोळण घेतांना, महाराज आपण धन्य आहात! आपल्या स्पर्शाने मी अजरामर झालो आहे! आज पासून तुम्ही माझे मालक आहात. असे बोलू लागला. बादशहाला ऐकल्याबरोबर संत सेना महाराज आश्चर्याने अक्षरशः रडायला लागले. त्यांच्या लक्षात आले. उशीर झाल्यामुळे आपले काम प्रत्यक्ष विठ्ठलाने केले. त्यांतर सेना महाराजांनी उर्वरित आयुष्य पंढरपूर येथे संतांच्या मेळ्यात, श्रीविठ्ठल भक्तीत व्यतीत करण्याचे ठरवले आणि तात्काळ पंढरपूरच्या दिशेने निघाले.

पंढरपूरमध्ये संत नामदेवादी विविध धर्म, पंथातून आलेल्या वारकऱ्यांची भेट झाली. न्हावी असल्यामुळे त्यांनाही श्रीविठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश निषिद्ध होता, त्यामुळे वाळवंटातच वारकरी भजन, कीर्तनामध्ये ते रममाण होऊन वारकरी भजन-भक्तीचे अनुकरण करत होते. त्यातच त्यांनी संत नामदेव-संत ज्ञानदेव आदि महाराजांच्या मार्गदर्शनात चिंतन मांडायला सुरुवात केली. संत सेना महाराज गायन, किर्तन करायला लागले. संत सेना महाराजांना अनेक गोष्टींची अनुभूती झाली. आपले नाभिकपणाचे नियमित कार्य करताना

आम्ही वारीक वारीक ।
करू हजामत बारीक ।।
विवेक दर्पण आयना दाऊ ।
वैराग्य चिमटा हालऊ ।।
उदक शांती डोई घोळू ।
अहंकाराची शेंडी पिळू ।।
भावार्थाच्या बगला झाडू ।
काम क्रोध नखे काढू ।।
चौवर्णा देऊनी हात ।
सेना राहिला निवांत ।।

असे अलौकिक अभंग ते लिहू लागले. भजन, भक्ती, वैराग्य, कर्तव्यभाव, जागृती इत्यादींच्या अनुषंगाने त्यांनी जवळपास १३३ पेक्षाही जास्त अनुभूतीपूर्ण, चिंतनीय अभंग लिहिले. सर्वच अभंगांचा उहापोह करण्यापेक्षा सेना महाराजांच्या या एका अभंगाचा आपण जरा बारकाईने विचार करुया. आपले काम किती श्रेष्ठ आहे? त्यातून लोकांना आपण काय शिकवणूक देतो? लोकांना आपल्याकडून काय अपेक्षित आहे? याशिवाय विशेषतः आम्ही वारकरी, चौवर्णा ला हात देऊ म्हणजेच वर्णव्यवस्था नाकारून आम्ही आमची स्वतंत्र समते-ममतेची वारकरी बैठक उभी करू असे तत्कालीन व्यवस्थेला सेना महाराज ठासून सांगतात. विवेक, वैराग्य, शांती धारण करतांना अहंकार, काम, क्रोध इत्यादी सोडून देतांना जीवनात भक्ती, भावार्थाला अनन्यसाधारण महत्व देण्याचे सेना महाराज प्रतिपादन करतात.

संत सेना महाराजांच्या एकूणच अभंगांचा चरित्राचा आणि त्या अनुषंगाने कार्याचा आढावा घेतल्यास इतर वारकरी संतांप्रमाणे संत सेना महाराजांनी आपल्या कामांमध्ये श्री विठ्ठल पाहिला. ज्याप्रमाणे संत सावता महाराजांना कांदा-मुळा भाजीमध्ये श्री विठ्ठलाचे दर्शन होत होते त्याच न्यायाने संत सेना महाराजांना दाढी, कटिंग करताना प्रत्येक ग्राहकामध्ये श्री विठ्ठल दर्शन होत होते. संत सेना महाराजांना आपल्या ग्राहकांमध्ये श्रीविठ्ठल दिसत होता. त्यातूनच त्यांनी सर्वश्रेष्ठ असा कर्म सिद्धांत मांडला.

सज्जनहो, आज आपण वारकरी संप्रदाय आणि वारकरी परंपरा व्यवस्थित समजून घेतली पाहिजे. आपले हातातील कामच श्रेष्ठ आहे ही वारकरी संप्रदायाची खरी ओळख आहे. सर्वच वारकरी संतांनी आपले काम सर्वश्रेष्ठ मानतांना आपला मूळ आचारधर्म सोडला नाही. त्यामुळेच वारकरी सांप्रदाय हा एक वेगळा स्वतंत्र, समता, ममता, स्वातंत्र्य जोपासणारा महान विचार आहे हे विसरून चालणार नाही. हा स्वतंत्र वारकरी धर्म आहे जिथे हिंसेला तिळभरही प्राधान्य नसून भजन, भक्ती, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, सौहार्द इत्यादी मूलगामी मानवी मूल्यांचे रोपण करताना ही सर्व मंडळी आपल्या अभंगांतून दिसत असते. कोणत्याही वारकरी व्यक्तीने आपले विहित कार्य प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि निष्ठेने केले पाहिजे. तद्वतच वारकरी संप्रदाय अठरापगड जातीतील लोकांना आपल्या हृदयात सामावून घेणारा महान विचार असून इथे भेदाला थारा नाही. आपण सर्वच श्रीविठ्ठलाची लेकरं आहोत. तेंव्हा, आज संत सेना महाराजांच्या पुण्यातीथीच्या निमित्ताने हा विचार जनामनामध्ये पेरूया, समता-ममतेचा वारकरी धर्म रूजवूया! जय हरी! संत सेना महाराज की जय!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
मो. ९१५८०६४०६८

# साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज



८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी समाज अधिक सुसंस्कृत, सुजाण आणि सक्षम बनावा, शिक्षणाच्या माध्यमातून मानवी कल्याण साधले जावे आणि प्रत्येकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, हा साक्षरता दिनामागील प्रमुख उद्देश आहे. अज्ञानामुळे होणारी पिळवणूक, फसवणूक आणि शोषण यापासून सामान्य माणसाची मुक्तता व्हावी आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी, यासाठी साक्षरतेला विशेष महत्त्व आहे.

निरक्षरता ही केवळ अक्षरओळखीचा अभाव नसून ती व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक विकासातील मोठा अडथळा ठरू शकते. त्यामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या उद्देशाने युनेस्कोने ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जगभर या दिवसाच्या माध्यमातून साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ लागले.

साक्षरता म्हणजे केवळ एखाद्या व्यक्तीला लिहिता-वाचता येणे नव्हे. दैनंदिन जीवनाशी संबंधित माहिती समजून घेणे, परिस्थितीचे आकलन करणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे, स्वतःचे निर्णय स्वतः घेणे आणि समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान देणे, ही साक्षरतेची व्यापक संकल्पना आहे. आजच्या डिजिटल युगात या संकल्पनेला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. डिजिटल माध्यमांचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करता येणे, ऑनलाइन माहितीची सत्यता तपासणे आणि आर्थिक व्यवहारांबाबत आवश्यक ज्ञान असणे, हीदेखील आधुनिक साक्षरतेची महत्त्वाची अंग आहेत.

शिक्षणाचे महत्त्व कोणाला नाही? शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये विचार करण्याची क्षमता विकसित होते. आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता निर्माण होते आणि आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव होते. त्यामुळे गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी साक्षरता हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी देशातील साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी अनेक योजना व अभियान राबविली. १९९१ मध्ये भारताचा साक्षरता दर सुमारे ५२ टक्क्यांवर पोहोचला, तर २०११ च्या जनगणनेनुसार तो ७४.०४ टक्के झाला. म्हणजेच स्वातंत्र्यानंतर भारताने साक्षरतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. मात्र शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही.

देशातील विविध राज्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण समान नाही. काही राज्यांनी साक्षरतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तर काही राज्यांना अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे. ग्रामीण भागातील निरक्षरता, आर्थिक अडचणी, शाळाबाह्य मुले, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, स्थलांतरित कुटुंबांची समस्या आणि शिक्षणातील असमानता ही आव्हाने अजूनही कायम आहेत.

देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना आणि नवभारत साक्षरता कार्यक्रम यांसारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. या योजनांचा उद्देश केवळ शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे नसून शिक्षणाचा दर्जा सुधारणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि प्रौढ निरक्षरांना साक्षरतेची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

मात्र साक्षर-तेची जबाबदारी केवळ सरकारची नाही. पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजातील सुशिक्षित नागरिक यांनीही यामध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आपल्या परिसरातील एखादी निरक्षर व्यक्ती लिहिता-वाचता शिकली, एखादे मूल शाळेत गेले किंवा एखाद्या मुलीला शिक्षणाची संधी मिळाली, तरी तो साक्षर भारताच्या दिशेने टाकलेला महत्त्वाचा टप्पा ठरेल.

आजच्या काळात 'शिक्षण सर्वांसाठी' ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता ती प्रत्यक्षात उतरविण्याची गरज आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रत्येक प्रौढाला साक्षर होण्याची संधी आणि प्रत्येक नागरिकाला आधुनिक जगात सक्षमपणे वावरण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळाले पाहिजे. साक्षर नागरिक हा केवळ स्वतःच्या कुटुंबाचा विकास घडवत नाही, तर तो समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही महत्त्वाची भूमिका बजावतो.

साक्षरता वाढली की जागरूकता वाढते, जागरूकता वाढली की जबाबदार नागरिक घडतात आणि जबाबदार नागरिकांमुळे लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच साक्षरता ही केवळ शिक्षणाची बाब नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.

भारताला विकसित आणि सक्षम राष्ट्र बनवायचे असेल, तर देशातील प्रत्येक नागरिक साक्षर आणि जागरूक असणे आवश्यक आहे. 'शंभर टक्के साक्षर, सक्षम आणि जागरूक भारत' हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक ध्येय झाले पाहिजे. शासनाच्या प्रयत्नांना समाजाची साथ मिळाली, तर निरक्षरतेवर मात करून साक्षरतेचे उद्दिष्ट नक्कीच साध्य करता येईल. जागतिक साक्षरता दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करूयास्वतः साक्षर होऊया, इतरांनाही साक्षर करूया आणि ज्ञानाच्या प्रकाशाने समाजातील अज्ञानाचा अंधार दूर करूया!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# शाळा हेच गावाचे ज्ञान मंदिर



आपल्या देशात शिक्षणाची फार दुरावस्था आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होऊन आपण अमृत वर्ष म्हणून साजरे करीत असताना आजही काही गावात बऱ्याच मुलांना शाळेत जाण्या-येण्यासाठी सुरक्षित रस्ते नाहीत. जीव मुठीत घेऊन रोज नदीचा किंवा ओढ्याच्या पाण्यातून आपली दप्तरे डोक्यावर घेऊन चाललेले विद्यार्थी दूरदर्शनवर पाहिलेले आहेत. आजही कित्येक गावाला रस्ते नाहीत. त्यामुळे शाळेत जाण्याची इच्छा असली तरी या गैरसोयीमुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. काही गावामधून आपणास पाहावयास मिळते लोकवर्गणीतून गावातील मंदिरे चकचकीत अगदी दिसून येतील, पण त्याच गावची शाळा पाहिली तर त्याचे छप्पर गळके आहे. बऱ्याच ठिकाणी भिंतींना भेगा किंवा चिरा गेलेल्या आहेत. खिडक्यांची दारे मोडकळीस आलेली दिसतील. भिंतीचा रंग उडालेला दिसेल. देवांच्या मंदिरापेक्षा गावच्या शाळेचे शाळारूपी मंदिर श्रेष्ठ आहे.

आता आपण जिल्हा परिषद शाळा म्हणतो, पण पूर्वी आपण शाळेला जीवन शिक्षण विद्या मंदिर असे म्हणत असत. एवढे शाळेचे महत्व आहे. संत गाडगेबाबा स्वतः अडाणी असले तरी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण म्हणजे लिहिता-वाचता येणे नाही तर खरे आणि खोटे यातील फरक समजून खोट्याला जुगारून खऱ्याचा स्वीकार करणे म्हणजे शिक्षण. गाडगेबाबा यांच्या नजरेतून पाहिले तर एकही माणूस अजूनही शिक्षित झाला नाही. ते नेहमी म्हणत देवळाला मदत करण्यापेक्षा शाळेला मदत करा. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करा. गरीब शिकले तरच आपल्या देशाचा विकास होईल. त्यासाठी गावच्या ग्रामस्थांनी त्या गावच्या शाळेत असणाऱ्या शिक्षकांना आर्थिक मदत केली तर आपल्या गावातील शाळा सुधारण्यास मदत होईल. आपली शाळा एक आदर्श शाळा म्हणून भविष्यात नावारूपाला येऊ शकते. अशीच एक नुकतीच बातमी वाचनात आली ती अशी की, गुरुजींनी ग्रामस्थांच्या मदतीने पाडेगावच्या शाळेचे पालटले रूपडे.

दुरावस्था झालेल्या पाडेगावच्या शाळेची डिजिटल व स्मार्ट शाळेकडे वाटचाल. शाळा राज्यात ठसा उमटवण्याचा विश्वास. पुणे व सातारा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या फलटण तालुक्यातील पाडेगाव गावठाण येथील दुरावस्था झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे रूपडे पालटू लागले आहे. बदलीहून आलेल्या नवीन शिक्षकांनी सुरुवातीला स्वतः पदरमोड करीत व नंतर ग्रामस्थांच्या मदतीने शाळेची दुरुस्ती करून डिजिटल व स्मार्ट शाळेकडे वाटचाल सुरू केली आहे. फलटण तालुक्यातील पाडेगाव गावठाणातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माण तालुक्यातून बदली होऊन आलेले विद्यार्थीप्रिय तसेच माणदेशाकडून 'दीनमित्र' उपाधी मिळालेले शिक्षक प्रवीण जोशी व पाडेगाव फॉर्म केंद्रातील इंग्रजी विषयाचे तज्ज्ञ बापूराव गायकवाड यांनी हजर झाल्यानंतर शाळेच्या बंद खोल्या, अडगळ तसेच डागडुजीच्या प्रतीक्षेत असलेली शाळेची दुरावस्था पाहिली. ग्रामस्थांच्या मदतीने नुतनीकरण करण्याचा संकल्प करून शाळेचे रुपडे पालटण्याचा विडा उचलला.

प्रवीण जोशी व बापूराव गायकवाड या नवीन शिक्षकांनी पाडेगाव गावठाणातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला स्वतः रंग देण्यास सुरुवात केली. त्यासाठी सुरुवातीला दोन्ही शिक्षकांनी पदरमोड केली. हळूहळू गावकरीही यात सहभागी होऊ लागले. शाळा समितीची पुनर्रचना करण्यात आली. अध्यक्ष म्हणून सोमनाथ खरात यांची निवड झाल्यावर या मोहिमेला अधिक बळ मिळाले. खरात यांनी देखील शाळेच्या विकासाला वाहून घेतले. स्वतः नववी पास असून, मेंढपाळ करणारा तरुण शिक्षणाच्या प्रेरणेने काम करू लागला आणि हळूहळू शाळेचे रुप पालटू लागले. कपाटात बंद अवस्थेत पडलेले संगणक, स्मार्ट टीव्ही बोलू लागले, नादुरुस्त मशीन दुरुस्त करण्यात आल्या. प्रोजेक्टर सुरू झाले. बंद खोल्यांमधील नादुरुस्त विद्युत व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली. संगणक, इंटरनेट सुविधा, प्रोजेक्टर, अँड्रॉइड टीव्ही व टॅबलेट, मल्टी फंक्शन मशीन यांच्या साह्याने शाळा डिजिटल तर होत आहेत, पण त्याचबरोबर डे स्टडी, रीडिंग कॉर्नर, मूल्यवर्धन उपक्रम सुरू केल्याने शाळेची गुणवत्ता वाढत आहे.

गेल्या काही वर्षात पाडेगाव गावठाणातील जिल्हा परिषद शाळेचा पटदेखील घटत चालला होता. नवीन शिक्षकांनी पालकांच्या भेटीगाठी घेऊन पट वाढवण्यासाठी प्रयत्न केले. हळूहळू पट देखील वाढत असल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी लवकरच राज्याला मार्गदर्शक ठरेल, असा उपक्रम शाळा राबवणार असल्याचे मुख्याध्यापक बापूराव गायकवाड यांनी सांगितले. विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख बन्याबा पारसे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा रूपडे बदलत आहे. शाळेला गावकऱ्यांचे सहकार्य मिळत असून, नानासाहेब खरात पाटील हे देखील शाळेच्या नुतनीकरणात सहभागी होत आहेत.

स्मार्ट व डिजिटल शाळा बनविण्यासाठी आवश्यक साधने जमा करण्यात येत आहेत. गावातीळ तरुण यात सहभागी होताना दिसत आहेत. आनंद ढावरे या तरुणाने शाळेला विनामूल्य रंग देण्याचा विडा उचलला आहे. ग्राम पंचायत सदस्य प्रवीण ढावरे यांनी स्वतः पडक्या भिंतीना विनामूल्य प्लास्टर केले.

लवकरच शाळा राज्यात आपल्या कामाचा ठसा उमटवेल, असा विश्वास मुख्याध्यापक बापूराव गायकवाड यांनी व्यक्त केला. नवीन शिक्षकांनी शाळेचे रूपच पालटले आहे. एक आदर्श व उपक्रमशील शाळा म्हणून पाडेगावची शाळा नावावरपाला ०येत आहे. याचा आम्हाला आनंद आहे. गावातील मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा. यासाठी आम्ही शाळेसाठी हवे ते करू. सोमनाथ खरात अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती पाडेगाव. मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे. यासाठी प्रथम भौतिक सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत. द्विशिक्षकी शाळांची समस्या ओळखून राज्याला मार्गदर्शन ठरेल, असा नवीन उपक्रम सुरू करत आहोत. शाळा स्मार्ट डिजिटल बनत आहे याचे समाधान आहे. गावकऱ्यांचे योगदान मिळत आहे.

प्रवीण जोशी शिक्षक जिल्हा परिषद शाळा, पाडेगाव गावठाण शाळा व्यवस्थापन समिती पाडेगाव. वरील बातमी वाचून फार आनंद वाटला. आपल्या ग्रामीण भागात शाळांची कमी अधिक प्रमाणात अशीच स्थिती आहे. तेथील ग्रामस्थांनी वरील प्रमाणे जर आपल्या गावच्या शाळेकडे जर लक्ष दिले तर आपल्या गावची शाळा सुध्दा इतर आदर्श शाळांच्या रांगेत येवून बसेल. पण त्यासाठी ग्रामस्थांनी शाळेला आर्थिक मदत करणेचे मनावर घेतले पाहिजे. जो पर्यंत तुम्ही मनावर घेनेचे नाव घेत नाही तोपर्यंत काहीच होणार नाही. डॉ. इंद्रजित देशमुख यांचे व्याख्यान तुम्ही कधी ऐकले असेल तर ते नेहमी सांगत कोणतेही काम अशक्य नाही फक्त ते काम करण्याचे मनावर घेतले पाहिजे ते तडीस गेलेच म्हणून समजा. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे. आपल्या राज्यातील नव्हे तर संपूर्ण देशातील शाळा आदर्श होतील. अशा गावच्या ग्रामस्थांचे आणि तेथील शिक्षकांचा पुरस्कार देवून सत्कार केला पाहिजे. अशा पुरस्कारामुळे इतर लोकांना सुध्दा एक प्रकारे प्रेरणा मिळत असते. प्रत्येक गावची शाळा हेच गावाचे ज्ञान मंदिर आहे. कारण याच शाळामधून आपल्या देशाचे भावी आदर्श नागरिक निर्माण होत असतात हे नाकारून चालणार नाही. त्यासाठी शासनाने शिक्षणासाठी जास्त तरतूद केली पाहिजे. देवळांच्यापेक्षा शाळेसाठी जास्त खर्च झाला पाहिजे. तरच देशाचे भावी नागरीक सज्ञानी निर्माण होतील. म्हणून शाळा हेच गावाचे ज्ञान मंदिर आहे.

**-जी. एस. कुचेकर पाटील**
भुईंज ता. वाई, जि. सातारा
मो. ७५८८५६०७६१

# भालचंद्र महाराज कहाळेकर यांचे कार्य बहुआयामी -डॉ. विद्या देवधर

**नांदेड (प्रतिनिधी)** –मराठीचे प्राध्यापक या नात्याने भालचंद्र महाराज कहाळेकर यांनी अध्यापनाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान तर दिलेच, तसेच हैद्राबाद आणि मराठवाड्यातील अनेक संस्थांच्या उभारणीत देखील त्यांचा सहभाग लक्षणीय होता. शिवाय समाज सुधारणेच्या कार्यातही ते सक्रिय होते. या अर्थाने त्यांचे कार्य आणि योगदान बहुआयामी होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य या संस्थेच्या अध्यक्ष तसेच परिषदेचे मुखपत्र असलेल्या 'पंचधारा' या नियतकालिकाच्या मुख्य संपादक डॉ. विद्या देवधर यांनी आज येथे केले. नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने 'वाङमयव्रती प्रा. भालचन्द्र महाराज कहाळेकर' या विषयावर व्याख्यान देताना त्या बोलत होत्या.

डॉ. देवधर यांनी भालचंद्र महाराज कहाळेकर यांच्या विविध क्षेत्रातील कार्य आणि योगदानाच्या सोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची तपशिलाने या वेळी मांडणी केली.



साहित्य क्षेत्रातील विविध संस्थांचे संस्थापक सदस्य किंवा पदाधिकारी या नात्याने भालचंद्र महाराज कहाळेकर यांनी हैदराबाद आणि मराठवाड्याच्या सार्वजनिक आणि सांस्कृतिक जीवनात मोलाची भर टाकली. मराठवाडा साहित्य परिषद, मराठी ग्रंथसंग्रहालय, हैदराबाद आणि मराठी साहित्य परिषद, तेलंगण आदी संस्थांशी त्यांचा निकटचा आणि सक्रिय संबंध होता. या संस्थांचा साहित्य क्षेत्रात आज जो लौकिक आहे त्यात भालचंद्र महाराज कहाळेकर यांचे लक्षणीय असे योगदान आहे, असे डॉ. देवधर यांनी यावेळी सांगितले.

'पंचधारा' या नियतकालिकाची संपादकीय चौकट देखील भालचंद्र महाराज कहाळेकर यांनी घालून दिलेली होय. पंचधाराच्या मुख्य संपादक या नात्याने आपण आजही त्याच चौकटीच्या अधीन राहून काम करत आहोत आणि त्यामुळेच त्याचा लौकिक आजही टिकून आहे, असे डॉ. देवधर यांनी यावेळी नमूद केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी भालचंद्र महाराज कहाळेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन श्रोत्यांना करून दिले. १९६५ साली हैदराबाद येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले आणि त्याच्या आयोजनाची मुख्य जबाबदारी ही भालचंद्र महाराज कहाळेकर यांची होती. मात्र या संदर्भातील दस्तऐवजांमध्ये त्यांचे नाव कुठेही आढळत नाही आणि याचे कारण त्यांची प्रसिद्धीपासून दूर राहण्याची वृत्ती हे होय, असे डॉ. देवधर यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

शिस्त, नेमकेपणा आणि काटेकोरपणा ही त्यांच्या वागण्याची आणि लेखनाची स्वभाववैशिष्ट्ये होत. विविध संस्थांच्या कार्याच्या संदर्भातील त्यांच्या कामाच्या पद्धतीत देखील हीच वैशिष्ट्ये आढळून येत असत. त्यांचे वाचन चौफेर होते आणि व्यासंग दांडगा होता. कुशल आणि विद्यार्थीप्रिय अध्यापक असणारे भालचंद्र महाराज कहाळेकर हे वर्गात शिकवताना कडक शिस्तीचे होते. मात्र वर्गाबाहेर ते विद्यार्थ्यांशी मैत्रीच्या नात्याने वागत आणि त्यांच्या सर्व प्रकारच्या अडीअडचणींमध्ये त्यांना मदत करीत असत. प्राचार्य नरहर कुरुंदकर हे भालचंद्र महाराज कहाळेकर यांना आपले गुरू मानत असत याचा आवर्जून उल्लेख यावेळी डॉ. देवधर यांनी केला.

दुर्दैवाने त्यांनी फारसे लिहिले नाही. त्यामुळेच त्यांचे कार्य आज काहीसे विस्मृतीत गेले आहे अशी खंत डॉ. देवधर यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्या अध्यक्ष प्रा. सौ. श्यामल पत्की या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच वक्त्यांचा परिचय डॉ. श्रीनिवास पांडे यांनी करून दिला तर डॉ. विश्वाधार देशमुख यांनी आभार मानले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून याप्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित विविध शाळा-महाविद्यालयातील चार ज्येष्ठ अध्यापकांचा डॉ.विद्या देवधर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सायन्स कॉलेज वरिष्ठ विभागातील डॉ. डी. आर. मुंडे, सायन्स कॉलेजच्या कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. एकनाथ खिल्लारे, पीपल्स कॉलेज वरिष्ठ विभागातील इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. शिवशंकर भानेगावकर, आणि पीपल्स हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी करा -खा. डॉ. गोपछडे



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पार्टी हा शिस्त आणि संस्कारांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये जिल्हाध्यक्षांना महत्त्वाचे स्थान असून, कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षाची ताकद वाढवावी, असे आवाहन खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केले.

भाजपा नांदेड दक्षिण जिल्हा कार्यकारिणीची बैठक सोमवारी पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, प्रदेश सचिव तथा नांदेड जिल्हा प्रभारी रेखाताई कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी प्रदेश सचिव देविदास राठोड, प्रदेश सदस्य राजेश कुंटूरकर, बालाजी बच्चेवार, सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अनिताताई चोंडीकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी सेवा सप्ताहानिमित्त माणिकराव लोहगावे यांनी माहिती दिली. महाराष्ट्र सरकारने केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव विजय धोंडगे यांनी मांडला. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि भारताचे पंतप्रधान म्हणून २५ वर्षांचा कार्यकाल पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा राजकीय प्रवास अनिल पाटील खानापूरकर यांनी मांडला. समरसता अभियानाची माहिती प्राचार्य मनोहर पवार यांनी सादर केली.

यावेळी बैठकीला मार्गदर्शन करताना खा. डॉ. गोपछडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा सर्वांगीण विकास होत असून, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विविध शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. सरकारच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करावी.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी जो कार्यकर्ता अधिक वेळ देईल, त्याचा पक्ष निश्चितपणे विचार करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नांदेड दक्षिण ग्रामीण भागात जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक बांधणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली अधिक सक्रियपणे काम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपाची सत्ता स्थापन करण्यासाठी आतापासूनच तयारीला लागावे, असे आवाहन डॉ. गोपछडे यांनी केले.

# दहीहंडी व शिक्षक दिन उत्साहात साजरा

**हदगाव (प्रतिनिधी)**– सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय हदगाव येथे दहीहंडी उत्सव व शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

दहीहंडी उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी राधा-कृष्ण, गोपिका, गोपाल आदींच्या आकर्षक वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या आनंदाने संपूर्ण शाळेचा परिसर उत्साहाने भरून गेला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला.

तसेच भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता



व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा आनंददायी व शैक्षणिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आचार्य रवींद्र, मुख्याध्यापक गजानन मोरे, तानाजी इबितवार, पल्लवी गव्हाणे, घाटे, श्रीमती एस. आर. काळे, पेंढारकर, गजानन इबितदार, संजय बोधने, सिद्धार्थ वंजे, हणमंत बरसमवार, काळे, साहेबराव लोंढे, मारोती तेलंग, अविनाश पांडागळे, संदीप गिरी यांनी परिश्रम घेतले.

# मातुळ गावावर वीज संकट; वारंवार वीज खंडित होत असल्याने ग्रामस्थ संतप्त

## शेतीची पिके वाळण्याच्या मार्गावर; बँकेचे व्यवहारही ठप्प

**भोकर (प्रतिनिधी)** –भोकर तालुक्यातील मातुळ गावांतील नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या समस्येमुळे ग्रामस्थांसह शेतकरी, व्यापारी आणि बँकेच्या ग्राहकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून, तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करीत मातुळ येथील समस्त गावकरी मंडळींच्या वतीने भोकर येथील महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

मातुळ गावातील ३३ के.व्ही. उपकेंद्रातून परिसरातील गावांना वीजपुरवठा केला जातो. मात्र मागील अनेक दिवसांपासून मातुळ फिडर तसेच परिसरातील इतर फिडरवर वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. मातुळ, फिडरला लागून असलेल्या परिसरातील गावांमध्येही ही समस्या गंभीर बनली आहे.

**रात्रंदिवस अंधार, शेतीला पाणी देणेही कठीण**

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने गावकऱ्यांना रात्रंदिवस अंधारात राहावे लागत आहे. पावसानेही दडी मारल्याने शेतातील पिकांना पाण्याची गरज असताना वीज उपलब्ध होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नाही. परिणामी पिके वाळण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

निवेदनात ३३ के. व्ही. फिडरमधील लाईन ३ तारांपैकी दोन तारांवरच सुरू असल्याने कमी झालेली वीज तीन तासांनंतर लगेच तीन तास वायबंद देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गावासाठी व शेतीसाठी स्वतंत्र लाईनची व्यवस्था करण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

**एसबीआय बँकेच्या व्यवहारांवरही परिणाम**

मातूळ येथे भारतीय स्टेट बँकेची शाखा असून, तिच्या अंतर्गत परिसरातील सुमारे ३० गावे येतात. या शाखेशी संबंधित ३६ गावांतील ग्राहकांना वारंवार वीज खंडित होण्याचा मोठा फटका बसत आहे. वीज नसल्यामुळे बँकेतील



संगणकीय व ऑनलाईन व्यवहार खोळंबत असून, ग्राहकांना अनेकदा बँकेत येऊनही काम न होता परत जावे लागत आहे.

**१५ सप्टेंबरपर्यंत प्रश्न सोडविण्याची मागणी**

वीज पुरवठ्याची समस्या तातडीने सोडवून मातुळ परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत समस्या मार्गी न लावल्यास मातुळ येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रासमोर शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यावेळी उपकेंद्रातील वीजपुरवठा बंद करण्यासह कार्यालयास टाळे ठोकून त्याच ठिकाणी उपोषण करण्याचा इशाराही निवेदनान्वये देण्यात आला आंहे. या निवेदनावर सतीश कदम, आनंद सूर्यवंशी, भगवान कदम,पांडूरंग डांगे, चक्रधर कदम, बबलू कदम यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महात्मा गांधी प्राथमिक शाळेत गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा गांधी प्राथमिक शाळा सिडको येथे गोकुळाष्टमी निमित्ताने ५ सप्टेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी कृष्ण राधा भूमिका साकारली. अखेर बोल बजरंग बली की जय, श्रीकृष्ण भगवान की जय आदी घोषणा देत विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडली.

गोकुळाष्टमी निमित्ताने आयोजित दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राधा-कृष्ण भूमिका अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी साकारली होती. शाळेचे मुख्याध्यापक राऊत एस. व्ही. तसेच सहशिक्षक श्रीमती मामीडवार एस. एल., घोणसे एस. एन., उपलंचवार एम. एम., राठोड एस. आर, पाटील एन. डी., केंद्रे आर. डी. व मुसळे ए. एन. यांच्यासह सर्व कर्मचारीवृंद कार्यक्रमास उपस्थित होते.

# गोतस्करांवर पोलिसांचा छापा; ३८ गोवंशाची सुटका

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात गोवंश अवैध वाहतुकीविरुद्ध राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत अर्धापूर पोलिसांनी कारवाई करत कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ८ गोवंश जनावरांची सुटका केली आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी अर्धापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मांजरमकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, काझी गल्ली, अर्धापूर येथील पत्र्याच्या शेडमध्ये कत्तलीच्या उद्देशाने जनावरे डांबून ठेवली आहेत ही माहिती मिळताच पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला.

छाप्यात ८ गोवंश जनावरे दोरीने निर्दयीपणे बांधून, कोणतीही वैद्यकीय व कायदेशीर परवानगी नसताना डांबून ठेवलेली आढळली. पोलिसांनी पंचनामा करून ३ लाख ६५ हजार रुपये किमतीची ८ जनावरे जप्त केली.

# इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– शारदा भवन शिक्षण प्रसारक मंडळ संचालित इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षण दिनाच्या निमित्ताने स्वयंशासित दिन उत्साहात साजरा केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरित होऊन भावी शिक्षक होण्यासाठी एक दिवस कॉलेज आपल्या हातामध्ये घेऊन विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून शिकवणीचे काम केले.

५ सप्टेंबर शिक्षण दिनाचे औचित्य साधून स्वयंशासित दिनी विद्यार्थ्यांमधूनच मुख्याध्यापक म्हणून दीपिका झडते, उपमुख्याध्यापक म्हणून समृद्धी सोनसळे, पर्यवेक्षक लक्षित निखाते, वरिष्ठ लिपीक पदाचा कार्यभार वैष्णवी पांचाळ यांनी सांभाळला. विद्यार्थ्यांचे पाठ तपासण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. व्ही. आर. देशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक, प्रा. डॉ. आर. टी. नांदेडकर, प्रा. डॉ. एस. डी. शिंदे, प्रा. सौ. झेड. एस. फाजगे, प्रा. डॉ. एस. एम. देशमुख, प्रा. सौ. एस. डी. कोठुळे, प्रा. एस. आर. सातानुरे, प्रा. एन. डी. दारमोड, प्रा. डी. एम. मोरे, प्रा. के. जी. पुयड, प्रा. एस. के. हापगुंडे, स्वप्नील पाताळे, सतीश कुकुटला, महादेवी स्वामी यांनी परिश्रम घेतले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्रा. एस. आर. सातानुरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना फळे वाटप केली.

# सिडको साईबाबा मंदिर येथे महाप्रसादाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको ते शिर्डी पदयात्रा परतल्यावर साईबाबा मंदिर सिडको येथे महाप्रसादाचे आयोजन गणेश जरस्वाल यांच्यावतीने करण्यात आले होते.

सिडको ते शिर्डी पदयात्रा सिडको येथून १५ ऑगस्ट रोजी निघून १ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे पोहोचली व परत नांदेड येथे आल्यानंतर श्री साईबाबा मंदिर येथे सकाळी आरती, पूजा करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. नरेश रायेवार, काचावार, नागोराव वाघमोडे, आनंद सोमेवाड, रमेश भद्रे, शिवाजी श्रीवास्तव, बाळू सूर्यवंशी, राजू बचेवार, संदीप देवसरकर, मारोती वाघमारे यांची उपस्थिती होती. या महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला. यावेळी सर्व पालखी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# 'थोडेसे भारताबाहेर'मधून उलगडली जगभ्रमंतीची नवी दृष्टी -डॉ. पी. विठ्ठल

## 'थोडेसे भारताबाहेर' या पुस्तकाचे थाटात प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवास म्हणजे केवळ नवनवीन ठिकाणांना भेट देणे नव्हे, तर त्या ठिकाणचा इतिहास, संस्कृती, माणसे आणि जीवनशैली जाणून घेण्याची संधी असते. प्रवासातून माणसाची विचारदृष्टी समृद्ध होते आणि जगाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मिळतो. प्रा. राम वाघमारे यांच्या थोडेसे भारताबाहेर या प्रवासवर्णनातून वाचकांना असाच समृद्ध अनुभव मिळतो, असे मत प्रसिद्ध साहित्यिक डॉ. पी. विठ्ठल यांनी व्यक्त केले.

इसाप प्रकाशन आणि बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ बिजूर, ता. बिलोली यांच्या वतीने डॉ. राम वाघमारे लिखित थोडेसे भारताबाहेर या प्रवासवर्णनाच्या पुस्तक प्रकाशन सोहळा ४ सप्टेंबर रोजी शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात पार पडला.




डॉ. गायत्री पांपटवार यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी शिवाजी अंबुलगेकर होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पी. विठ्ठल बोलत होते.

पुढे डॉ. विठ्ठल म्हणाले, भाषा ही केवळ संवादाचे माध्यम आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. त्या भाषेतून व्यक्त होणारी भावना आणि विचार लोकांपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचतात, हे अधिक महत्त्वाचे आहे.

मराठीतील प्रवासवर्णनाच्या परंपरेचा संदर्भ देताना डॉ. पी. विठ्ठल यांनी विष्णुदास गोडसे यांच्या माझा प्रवास या ग्रंथाचा उल्लेख केला. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या माझा रशियाचा प्रवाससह पु. ल. देशपांडे, गो. नी. दांडेकर आणि मीना प्रभू यांसारख्या साहित्यिकांनी मराठी प्रवासवर्णन समृद्ध केल्याचे त्यांनी सांगितले.

या समृद्ध परंपरेला डॉ. राम वाघमारे यांचे थोडेसे भारताबाहेर हे पुस्तक पुढे नेत आहे. साधी, सहज आणि वाचकांना आपलेसे करणारी भाषा हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य असून, लेखकाने केवळ स्थळवर्णन न करता त्यामागील संस्कृती आणि अनुभव संवेदनशीलतेने मांडले आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

१२ ते १३ वर्षांपूर्वी केलेल्या ताश्कंद, दुबई आणि नेपाळ या तीन देशांच्या प्रवासातील अनुभवांना वाघमारे यांनी थोडेसे भारताबाहेर मध्ये शब्दबद्ध केले आहे. ताश्कंद भेटीदरम्यान भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या स्मारकाला दिलेली भेट आणि त्यांच्या तत्त्वनिष्ठ राजकारणाची केलेली आठवण हा पुस्तकातील विशेष उल्लेखनीय भाग असल्याचेही डॉ. पी. विठ्ठल यांनी सांगितले.

हे पुस्तक केवळ पर्यटनस्थळांची माहिती देणारे नसून, वाचकांची सांस्कृतिक आणि सौंदर्यदृष्टी विस्तारण्याचे काम करते. प्रवासातील अनुभवांकडे संवेदनशील नजरेने पाहण्याची लेखकाची दृष्टी या पुस्तकाला साहित्यिक मूल्य प्राप्त करून देते, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध कवी शिवाजी अंबुलगेकर यांनी जागतिक प्रवासवर्णनांच्या दाखल्यांतून जगभ्रमंतीचे महत्त्व विशद केले. जग पाहिल्याने माणसाचे अनुभवविश्व विस्तारते, विचार समृद्ध होतात आणि त्यातून समाजविकासालाही चालना मिळते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. राम वाघमारे यांच्या पुस्तकामुळे वाचकांना परदेशातील अनुभवांसोबतच इतिहास, संस्कृती आणि तेथील माणसांकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत दाढेल यांनी केले. सूत्रसंचालन राम तरटे यांनी केले, तर प्रा. डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# मार्कंड येथे भागवत कथा सोहळ्यात सात महिलांचा मातृ गौरव म्हणून सन्मान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील मार्कंड येथे श्रावणमास निमित्ताने आयोजित भागवत कथा सोहळ्यात मनपाच्या माजी महिला बालकल्याण सभापती प्रा. ललिता शिंदे यांच्या वतीने मातृगौरव पुरस्काराने सात महिलांचा सन्मान करण्यात आला.

मार्कंड येथे मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्या सौजन्याने श्रावण मास निमित्ताने दि. १ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या भागवताचार्य दीपक गुरू महाराज ढोणीपांगरकर यांच्या रसाळ वाणीने भागवत कथा मार्कंडेश्वर मंदिराच्या पवित्र परिसरात सुरु करण्यात आली होती. दि. ३ सप्टेंबर २६ रोजी नांवामनपाच्या माजी नगरसेविका ललिता मुकुंद बोकारे (शिंदे) यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांचा मातृगौरव पुरस्काराने श्रीमती सुरेखाताई नेरलकर, स्नेहलता पवार (लेडगावकर), पार्वतीबाई कोरडे, संतोषी भाले (कंठाळे), संगीता लामदाडे, मंगला धुळेकर, विजया गोडघासे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील असंख्य कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी सेवानिवृत्त प्रा. मुकुंद बोकारे, दिगंबर येवले, बालाजी येवले, बाबुराव बोकारे, भानुदास बोकारे, संतुकराव येवले, रंगनाथ लामदाडे, आदिनाथ महाराज आणि समस्त गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शिवार

# दुग्धजन्य पदार्थ टिकविण्यासाठी आधुनिक तंत्र

**दुधामध्ये स्निग्धांश प्रथिने (Butterfat Proteins In Milk), मेद, जीवनसत्त्वे आणि पाणी यांचे प्रमाण मुबलक असल्याने सूक्ष्मजीवांची (Micro Organism) वाढ होते, पर्यायाने दूध (Milk) लवकर नासते. त्यामुळे दुग्धजन्य पदार्थ टिकविण्यासाठी मर्यादा येतात. पदार्थ टिकविण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत व्यवस्थित पोहोचवण्यासाठी 'पॅकेजिंग' हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. अपूर्ण पॅकेजिंग असलेले किंवा पॅकिंग नसलेले पदार्थ हे त्यांच्या गुणधर्मात अनेक बदल दर्शवितात. त्यामुळे याचा परिणाम वितरणावर होतो. उत्तम पॅकेजिंगचा वापर करून पदार्थ आहे त्या परिस्थितीत जास्तीत जास्त टिकविण्यास मदत होते. बाजारात ब्रॅण्ड तयार करण्यासाठी पॅकेजिंग महत्त्वाचे आहे. पॅकेजिंगसाठी ग्रीस प्रूफ पेपर, पार्चमेंट पेपर (बटर पेपर), प्लॅस्टिक कोटेड पेपर, पेपर बोर्ड आदी प्रकारांचा वापर करतात. विविध दुग्धपदार्थांसाठी वेगवेगळ्या पॅकेजिंगचा वापर केला जातो...**

- खवा : पीएफए कायद्यानुसार खवा टिकविण्यासाठी कुठलाही पदार्थ वापरण्यास बंदी आहे. ॲल्युमिनिअम फॉइल आणि एलडीपीई पॉलिथिनमध्ये खवा पॅक करून तो १३ ते १५ अंश सेल्सिअस तापमानास ठेवल्यास १४ दिवसांपर्यंत चांगल्या स्थितीत टिकतो. लॅमिनेट्सचा वापर खवा पॅकिंगसाठी करतात.
- बर्फी, पेढा : बर्फी गरम अवस्थेत निर्जंतुक केलेल्या पॉलिस्टर टबमध्ये (२५० ग्रॅम) भरून मल्टिलेअर नायलॉन पाउचमध्ये हवाबंद पॅक केल्यास ३० अंश सेल्सिअस तापमानास ५२ दिवसांपर्यंत टिकते. यामध्ये हवाबंद पॅकिंग न करता ३० अंश सेल्सिअसपर्यंत तापमानास साठवल्यास बर्फी १५ दिवसांपर्यंत चांगल्या स्थितीत राहते. निर्जंतुक केलेल्या श्रिंक फिल्ममध्ये तीन आठवड्यांपर्यंत पेढे टिकतात. कार्डबोर्डमध्ये ५ अंश सेल्सिअस तापमानास पेढे ३० दिवसांपर्यंत टिकवता येतात.
- रसगुल्ला, गुलाबजाम : दोन्ही पदार्थ बाजारात टीन कॅन्समध्ये मिळतात; परंतु हे कॅन्स आतून लॅकर्ड असायला हवेत. यामुळे दुग्धजन्य पदार्थ व कॅनचा थेट संपर्क न होता पदार्थ खराब होणार नाही. गुलाबजाम, रसगुल्ला टीन कॅन्समध्ये साधारण तापमानाला १८० दिवसांपर्यंत टिकतात. पॉलिस्टरीन कपमध्ये पॅक केलेले गुलाबजाम ५ अंश तापमानास ३० दिवसांपर्यंत राहू शकतात. गुलाबजाम साखरेच्या पाकात सर्वसाधारण तापमानास ५ ते ७ दिवस टिकतात.
- पनीर : पनीर एक दिवस किंवा त्यापेक्षाही कमी टिकते. पनीरचे छोटे तुकडे करून ते टीन कॅनमध्ये पॅक करून टीन कॅनला १५ मिनिटांसाठी ऑटोक्लेव्हिंग केले, तर २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमानास सदर टीन कॅन्समध्ये पनीर ५ दिवसांपर्यंत टिकते.
- दही : दह्यासाठी पॉलिस्टरीन कप वापरतात. पॉलिप्रोपॅलीन, पीव्हीसी यांचाही वापर केला जातो. पॉलिस्टरीन किंवा पॉलिप्रोपॅलिनच्या कपात दही पॅक करून ५ अंश सेल्सिअस तापमानामध्ये फ्रिजमध्ये ठेवल्यास दही सात दिवसांपर्यंत टिकू शकते.
- बासुंदी : ॲल्युमिनियम फॉइलमध्ये ५ अंश सेल्सिअस तापमानामध्ये बासुंदी ३० दिवसांपर्यंत टिकते.
- पॉलिप्रोपॅलीन कपमध्ये पॅक केलेली बासुंदी ७ अंश सेल्सिअस तापमानास २५ दिवसांपर्यंत टिकते.
- श्रीखंड : श्रीखंडासाठी पॉलिस्टरीन आणि पॉलिप्रोपॅलिन पॅक करून १० अंश सेल्सिअस तापमानाला ठेवलेले श्रीखंड १८० दिवसांपर्यंत टिकवता येते.
- लस्सी : एलडीपीई (६०-८० मायक्रॉन) पाउचमध्ये पॅकिंग करून ५ अंश सेल्सिअस तापमानास ठेवलेली लस्सी ७ दिवसांपर्यंत टिकते.

| दुग्धपदार्थ | पॅकेजिंगचा प्रकार |
|---|---|
| सुगंधी दूध, लस्सी | एलडीपीई, एचडीपीई टीन कॅन, काचेच्या बाटल्या. |
| तूप, आटलेले दूध, दही, श्रीखंड | पॉलिप्रोपॅलिन, पॉलिस्टरीन आदी. |
| पेढा, बर्फी, कलाकंद, चीज, चोकोबार | कार्डबोर्ड बॉक्स, वॅक्स कोडेट पेपर आदी. |
| गुलाबजाम, रसगुल्ला, तूप, पनीर | टीन कॅन, लॅमिनेटेड पाऊच, एचडीपीई आदी. |



# पावसाच्या खंड काळात फळबागेचे पाणी व्यवस्थापन!

**पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप पीकासोबतच फळपिकांनाही झळ बसतेय. फळाबागेला पाण्यात ताण बसल्यामुळे काय परिणाम होतो आणि अशावेळी डाळिंब, मोसंबी, संत्रा, केळी, सीताफळ आणि अंजीर बागेत कोणते उपाय करायचे याची तज्ञांनी दिलेली माहिती पाहूया...**



डाळिंबाची मृग बहराची बाग सध्या फळ 'सेटिंग'च्या अवस्थेत आहे. या बागांना संरक्षित पाणी द्यावे. याशिवाय आच्छादनही करून बाष्परोधकाची फवारणी करावी. पाण्याच्या ताणामुळे वाढीच्या अवस्थेतील बागांमधील फळांचा आकार लहान झाला आहे. काही ठिकाणी फळगळ, फूलगळ दिसत आहे. या ठिकाणी फळांची विरळणी करा. बऱ्याचशा मोसंबी लागवड क्षेत्रात पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे झाडाच्या मुळांजवळील तापमानात वाढ झाल्यामुळे फळगळ दिसून येत आहे. फळगळ नियंत्रणासाठी बागेस संरक्षित पाणी देणे आवश्यक आहे. संत्रा बागेत बऱ्याचशा भागात मागील महिन्यात जोराचा पाऊस झालाय अशाठिकाणी बागेत पाणी साचल्याने फळगळ झाली होती. अशा बागेत वाफसा लवकर येण्यासाठी दोन ओळीत चर काढून घ्यावा. काही भागात ढगाळ वातावरणामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यान फळगळ दिसत आहे. काही भागात अजूनही पुरेसा पाऊस नसल्याने बागेला ताण बसला आहे. त्यामुळे देखील फळगळ दिसत आहे. अशा बागांमध्ये एक टक्का पोटॅशिअम नायट्रेटची फवारणी करा. यामुळे झाडावरील ताण कमी होऊन बागेचे, पोषण होण्यास मदत होईल. मागील काही दिवसांपासून वातावरण उष्ण, दमट आहे. त्यामुळे केळीवर 'पोंगा कूज' या रोगाचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोंगा आणि जमिनीलगतचा बुंधा कुजतो. अशा बागेला वेळापत्रकानुसार रासायनिक खतांच्या मात्रा द्याव्यात. कांदेबाग केळीच्या घडांची कापणी योग्यवेळी करावी. जास्त पिकलेल्या घडांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. अशावेळी बागेत पडलेली केळी गोळा करून बाग स्वच्छ ठेवावी. सीताफळ बागेत लवकर बहर धरलेल्या बागेतील फळांचा हंगाम संपला आहे. पण पाणी कमी पडल्याने फळांचा आकार कमी राहिलेला आहे. ज्या बागा फळ सेटिंगच्या अवस्थेत आहेत त्याठिकाणी पाण्याचा ताण बसल्याने फळांच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या बागांमध्ये संरक्षित पाणी द्या. काही भागांमध्ये मिलीबग किडीचा प्रादुर्भाव दिसत आहे. या ठिकाणी तातडीने उपाययोजना करताना खोडांची व फांद्यांची स्वच्छता करा. मिलीबगची पिल्ले खोडावरून झाडावर चढतात. यासाठी उपाय म्हणून १५ ते २० सेंटिमीटर रुंदीची प्लॅस्टिक पट्टी खोडाला बांधून, त्यावर ग्रीस लावावे. या ग्रीसला पिल्ले चिकटून मरतात. अंजीर बागेत पुरेसा पाऊस नसल्याने खट्टा बहराचे नियोजन लांबले आहे. त्यामुळे फळांचे उत्पादन उशिरा सुरू होऊ शकतं. त्यामुळे अंजीर बागेला लवकरात लवकर पाणी द्या. अशाप्रकारे फळबागेत विविध उपाय करून कमी पाण्यातही फळबाग तग धरुन राहू शकेल.

# पावसाच्या खंड काळात घ्यावयाची काळजी

**बऱ्याचवेळा सरासरी एवढा पाऊस झाला तरी नेमका पीकवाढीच्या संवेदनशील अवस्थेत पावसाचे १ ते २ खंड आढळून येतात. हे पावसाचे खंड बऱ्याचवेळा जुलै, ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात आढळून येतात. हा पावसाचा अनियमितपणा किंवा खंड पिकांच्या सुरुवातीच्या अवस्थेत, पिकांच्या मध्यावस्थेत आणि पक्वतेच्या काळातसुद्धा येऊ शकतो आणि त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.**

सर्वसाधारणपणे पाऊस नेहमीपेक्षा उशिरा सुरू होणे, पाऊस नेहमीपेक्षा लवकर बंद होणे, पाऊस वेळेवर सुरू होणे व मध्येच मोठा खंड पडणे आणि अतिवृष्टी होणे अशाप्रकारे कोणतीही एक आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ शकते. सध्या अनेक ठिकाणी पावसाचा खंड आढळून येत आहे. काही ठिकाणी वेळेवर पेरणी झाली त्याठिकाणी पिकांची वाढ समाधानकारक आहे. परंतु, पावसाच्या खंडामुळे पिकांचे व्यवस्थापन योग्य रितीने करणे आवश्यक आहे. काही ठिकाणी उशिरा पेरणी झाली आहे, तेथे पिकांसाठी पावसाचा खंड काळात योग्य उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे.

- पाणी व्यवस्थापन : या काळात विहीर किंवा शेततळ्यात पाणी असल्यास पिकांच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित पाणी सिंचन (तुषार किंवा ठिबक सिंचन) द्वारे द्यावे. खरिपातील पिकांची उगवण झाल्यावर सर्वसाधारण १५ ते २० दिवसांनंतर पिकांमध्ये ४ ते ६ ओळीनंतर बळीराम नांगर अथवा कोळप्याच्या मदतीने सऱ्या काढाव्यात. यामुळे सुरुवातीस पडलेला पाऊस सऱ्यांमध्ये साठविला जाऊन पाण्याची उपलब्धता वाढते. उत्पादनात १५-२० टक्के वाढ होते. उशिरा झालेला पाऊस सऱ्यांमध्ये मुरविला जातो, जो पुढे रब्बी पिकांना लाभदायक ठरतो.
- कोळपणी करून मातीची भर देणे : पावसाचा खंड काळात पिकांच्या अवस्थेनुसार हलक्या कोळपण्या कराव्यात, पिकांना मातीची भर द्यावी, भेगा बुजविल्या जातात. याद्वारे ओलावा साठवून ठेवण्यात मदत होते.
- तण व्यवस्थापन : तणे ही अन्नद्रव्ये व जमिनीतील ओलावा यासाठी पिकांसोबत स्पर्धा करतात. तणांना पिकापेक्षा दोन ते तीन पट अधिक प्रमाणात पाणी लागते. पावसाच्या ताणाच्या काळात पिकांतील तणांचे योग्य वेळी नियंत्रण करावा. कोळप्याने वरचेवर उथळ मशागत (हलकी कोळपणी) करावी. यामुळे पिकाबरोबर तणांची स्पर्धा कमी होऊन जमिनीतील ओलावा जास्त काळ टिकेल. झाडाभोवती हलकीशी चाळणी करावी. तण काढून घ्यावे व झाडाभोवती मातीचे आच्छादन करावे. त्यामुळे जमीन भुसभुसीत होण्यास मदत होते. भेगा बुजविल्या जाऊन बाष्पीभवनाद्वारे पाणी जे वाया जाते ते वाचविले जाते. यामुळे १० ते १५ मि. मी. ओलाव्याची बचत होते. गरजेनुसार निंदणी व कोळपणी करून तणांचे नियंत्रण करावे. तसेच परिस्थितीनुसार तणनाशकांचा वापर करावा.



# झेंडू लागवडीसाठी हवे योग्य नियोजन



**झेंडूच्या फुलांना सण-समारंभात चांगली मागणी असल्यामुळे फुलशेतीमध्ये झेंडुला (Marigold) महत्त्वाचे स्थान आहे. झेंडूची लागवड वर्षभर म्हणजे सर्व हंगामात करता येते. परंतु योग्य बाजारभाव मिळविण्यासाठी आणि सण-समारंभाच्या काळात फुलांचे उत्पादन मिळेल याप्रमाणे लागवडीची वेळ ठरवावी. लागवडीपासून साधारणतः अडीच ते तीन महिन्यात फुलांचे उत्पादन मिळण्यास सुरुवात होते त्यानूसार लागवडीचे नियोजन करावे. फुलशेतीमध्ये झेंडू हे मुख्य पीक म्हणून घेतले जाते. तसेच भाजीपाला व फळपिकांमध्ये सूत्रकृमी नियंत्रणासाठी झेंडूचे मिश्रपिक घेतले जाते. राज्यात प्रामुख्याने पुणे, नाशिक, नगर, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोला, नागपूर या जिल्ह्यांत झेंडूची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते.**

## झेंडू पिकासाठी जमीन कशी असावी?

झेंडू पिकासाठी उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६ ते ७.५ असावा. हलकी ते मध्यम जमीन या पिकास पोषक आहे. भारी जमिनीत पिकाची वाढ चांगली होत असली तरी उत्पादन कमी मिळते. उष्ण आणि समशीतोष्ण हवामान असेल तर झेंडूची वर्षभर लागवड करता येते. थंड हवामानात हे पीक चांगले येते. दर्जेदार फुलांचे उत्पादन मिळते. जास्त पावसाचा परिणाम फुलांच्या वाढीवर होतो.

## झेंडुच्या प्रमुख जाती कोणत्या?

- झेंडूच्या झाडाची उंची, वाढीची सवय आणि फुलांचा आकार यावरुन झेंडूच्या जातींचे आफ्रिकन आणि फ्रेंच या दोन प्रकारांत वर्गीकरण करता येते.
- आफ्रिकन झेंडू : या प्रकारातील झेंडूची झाडे १०० ते १५० सें. मी. उंच वाढतात. फुले टपोरी असून फुलांना केशरी आणि पिवळ्या रंगाच्या छटा असतात. या प्रकारातील फुले हारांसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जातात. आफ्रिकन झेंडूमध्ये कॅकरजॅक, आफ्रिकन टॉल डबल मिक्स्ड, यलो सुप्रिम, गियाना गोल्ड, पाई, आलास्का, पुसा बसंती गेंदा या प्रमुख जाती आहेत.
- फ्रेंच झेंडू : या प्रकारातील झाडे बुटकी ३० ते ४० सें. मी. उंचीची आणि झुडूपासारखी वाढतात. फुलांचा आकार लहान ते मध्यम असून रंगात मात्र विविधता असते. फ्रेंच झेंडूमध्ये स्प्रे बटर लेमन ड्रॉप्स, फ्रेच डबल मिक्स्ड, अर्का बंगारा या प्रमुख जाती आहेत.

## खते आणि पाणी व्यवस्थापन

फुलांचे एकसारखे आणि भरपूर उत्पादन मिळण्यासाठी झेंडूला वरखते देणे आवश्यक आहे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि अर्धे नत्र लागवडीच्या वेळी आणि उर्वरित अर्धे नत्र लागवडीनंतर एक महिन्याने द्यावे. हेक्टरी ६० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश या प्रमाणात खते देऊन झाडाला मातीची भर द्यावी. पावसाळ्यात आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. झाडांना कळ्या आल्यापासून तोडणी संपेपर्यंत पाण्याचा ताण पडू देऊ नये. याच काळात आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी देऊ नये.





## लागवड कशी करावी?

झेंडूची लागवड बी पेरून किंवा रोपं लावून करता येते. २ बाय १ आकाराच्या गादीवाफ्यावर रोपे तयार करावीत. रोपे तयार करणे शक्य नसल्यास खात्रीच्या ठिकाणाहून रोपे आणावीत. पाच ते सहा पाने आलेली रोपे निवडावीत. ३ ते ४ आठवड्यांच्या रोपांची लागवड करावी. लागवडीपूर्वी जमीन हलकी नांगरुन नंतर २० ते २५ गाड्या शेणखत जमिनीत मिसळून घ्यावे. सपाट वाफे अथवा सरी वाफे तयार करावेत. त्यात रोपं लावावीत. जातीनुसार तसेच हंगामानुसार झेंडूची लागवड ४५ बाय ३० सें.मी. किंवा ६० बाय ३० सें.मी. अंतरावर करावी. प्रत्येक ठिकाणी निवडक एकच रोप ठेवावे.

## फुलांची काढणी व उत्पादन

लागवडीपासून साधारणपणे अडीच ते तीन महिन्यांत फुलांचे उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. जून महिन्यात लावलेल्या झेंडूच्या फुलांची तोडणी ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात सुरू होते. पूर्ण उमललेली फुले देठाजवळ तोडून वेचणी करावी. हारांसाठी देठविरहीत फुले तसेच गुच्छ किंवा फुलदाणीसाठी फुले देठासह तोडावीत. तोडणी दुपारनंतर करावी. तोडलेली फुले सावलीत गारव्याला ठेवावीत. योग्य काळजी घेतल्यास हेक्टरी ७ ते १० टनापर्यंत उत्पादन मिळते.

# जनावरांचे पाणी व्यवस्थापन

**जनावरांचे व्यवस्थापन करत असताना आहार आणि गोठा व्यवस्थापनाबरोबरच पाण्याचे व्यवस्थापनही तितकेच महत्वाचे आहे. गायी-म्हशींसारख्या जनावरांकडून आपण दुधाचे उत्पादन घेत असतो. दुधात जवळपास ८४ ते ८६ टक्के इतके पाणी असते.**

जनावरांचे संगोपन करीत असताना पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जनावरांच्या शरीरात वयोमानानुसार साधारणपणे ५० ते ९५ टक्के पाण्याचे प्रमाण असते. सुदृढ जनावरांच्या शरीरात वजनाच्या ५० ते ६० टक्के पाणी असते. गाय किंवा म्हैस गाभण असताना गर्भाशयात जवळपास ९५ टक्के पाणी असते.

## जनावरांना मकाचा चारा कशासाठी ?

जनावरांची पाण्याची गरज वयोमानानुसार तसेच शारीरिक अवस्थेनुसार बदलत असते. जनावरांना जवळपास ५० ते ७० लिटर पाण्याची गरज असते. ही गरज भरून काढण्यासाठी त्यांना २४ तास स्वच्छ, निर्जंतुक पाणी उपलब्ध करून द्यावे. वासराच्या जन्माच्या वेळी शरीरात ७५ ते ८० टक्के पाणी असते. वासरू पाच ते सहा महिन्याचे झाल्यावर शरीरातील पाण्याचे प्रमाण ७० टक्के इतके असते. एका गायीला सरासरी ३० ते ४० लिटर पाण्याची आवश्यकता असते. गोठ्याच्या साफसफाईसाठीही पाण्याची गरज असते. दूध देणाऱ्या गायीला एक लिटर दुधासाठी ४ ते ५ लिटर पाण्याची गरज असते. साधारणपणे १५ लिटर दुधाचे उत्पादन देणाऱ्या गायीला ६० लिटर पाणी फक्त दूध उत्पादनासाठीच लागते.

## पाण्याची आवश्यकता

दूध उत्पादनासाठी पाण्याची आवश्यकता असते. रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत चालू राहण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यासाठीही पाण्याची गरज असते. शरीरात तयार होणारे घातक पदार्थ शरीराबाहेर विसर्जित होण्यासाठी पाण्याची गरज असते. जनावर एका वेळेस पाणी प्यायले नाही तर दूध उत्पादनात २० ते ३० टक्क्यांनी घट होते. पाणी जनावरांच्या शरीरातील प्रत्येक अवयवासाठी गरजेचे असते. जनावरांच्या शरीरात पाणी दोन प्रकारे कार्य करत असते. पहिले म्हणजे मूत्र, दूध आणि रक्ताच्या स्वरुपात, दुसरे म्हणजे प्रथिने, विकरांच्या स्वरुपात असते.

# कांद्याने ओलांडली पन्नाशी! किरकोळ बाजारात रू. ७०; दरवाढीने गृहिणींचे बजेट कोलमडले



**नवी मुंबई (प्रतिनिधी)** – सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरातील महत्त्वाचा घटक असलेल्या कांद्याच्या दराने पुन्हा एकदा ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. नवी मुंबईतील झचउ घाऊक बाजारात कांद्याचा दर रू.५२ ते रू.५३ प्रति किलोपर्यंत पोहोचला असून किरकोळ बाजारात हाच कांदा छ६५ ते छ७० किलोपर्यंत विकला जात आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या या दरवाढीमुळे घरगुती बजेटवर मोठा परिणाम होत आहे.

पावसामुळे पिकाचे नुकसान आणि चांगल्या प्रतीच्या कांद्याची कमतरता ही दरवाढीमागची प्रमुख कारणे असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

नवी मुंबई APMCमध्ये कांद्याची आवक सुरू असली तरी त्यातील मोठ्या प्रमाणातील कांदा ओला किंवा खराब दर्जाचा असल्याने चांगल्या प्रतीच्या कांद्याचा पुरवठा तुलनेने कमी झाला आहे. २ सप्टेंबरला नाशिक आणि लासलगाव भागातून मोठ्या प्रमाणात कांदा बाजारात आला होता; मात्र त्यातील अनेक पोत्यांमध्ये ओला आणि खराब कांदा आढळल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे दर्जेदार कांद्याच्या भावावर दबाव वाढला आहे.

४ सप्टेंबरला झचउमध्ये सुमारे १५० ट्रक कांद्याची आवक झाली होती. मात्र आवक असूनही दर्जेदार मालाची उपलब्धता मर्यादित असल्याने दर कमी झाले नाहीत. नवीन कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू होईपर्यंत दर चढे राहण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

कांद्याच्या वाढत्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने बफर स्टॉकमधील कांदा छ३५ किलो दराने विक्रीसाठी उपलब्ध करून दिला आहे. २८ ऑगस्टपासून पहिल्या दहा दिवसांत १७ शहरांमध्ये सुमारे ४ हजार टन बफर कांद्याची विक्री करण्यात आली. मात्र देशातील सरासरी किरकोळ दरात अद्याप अपेक्षित घट झालेली नाही.

मग कांद्याचे दर पुन्हा कमी होणार कधी? नवीन आवक वाढते का, पावसामुळे झालेले नुकसान किती आहे आणि चांगल्या प्रतीचा कांदा बाजारात किती प्रमाणात उपलब्ध होतो, यावर आगामी काळातील दर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहेत.

# ईस्ट झोनने उभारला ७०८ धावांचा डोंगर

**चेन्नई (वृत्तसंस्था)** – दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात ईस्ट झोनच्या फलंदाजांनी साऊथ झोनच्या गोलंदाजांची अक्षरशः धुलाई करत पहिल्या डावात तब्बल ७०८ धावांचा डोंगर उभा केला. या धावसंख्येत सर्वात मोठा वाटा राहिला तो इशान किशनचा. डावखुऱ्या फलंदाजाने शानदार फलंदाजी करत २७० धावांची खेळी साकारली. मात्र त्रिशतकापासून अवघ्या ३० धावा दूर असताना त्याचा डाव संपल्याने चाहत्यांचे त्रिशतक पाहण्याचे स्वप्न अधुरे राहिले.

पहिल्या दिवसाचा खेळ संपताना ईस्ट झोनची अवस्था ४ बाद ३८५ अशी होती. इशान किशनने पहिल्याच दिवशी आपले शतक पूर्ण केले होते. दुसऱ्या दिवशी त्याने त्याच आक्रमक शैलीत फलंदाजी सुरू ठेवत साऊथ झोनच्या गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला. तब्बल ३३४ चेंडूंचा सामना करत ३० चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने त्याने २७० धावा केल्या. त्याचा स्ट्राईक रेट ८०.८४ इतका राहिला.

इशानसाठी ही खेळी अनेक अर्थांनी खास ठरली. हे त्याच्या प्रथम-श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील दुसरे द्विशतक ठरले, तर दुलीप ट्रॉफीतील त्याचे हे पहिले द्विशतक आहे. या सामन्यात त्याच्यासमोर प्रथमच प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये त्रिशतक झळकावण्याची मोठी संधी होती. मात्र २७० धावांवर त्याचा डाव संपल्याने त्रिशतकाचे स्वप्न पुन्हा एकदा अधुरे राहिले.

# ९ सप्टेंबरला रंगणार ६२ वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा; हृदयनाथ मंगेशकर, सलीम खान यांना जीवनगौरव

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राच्या समृद्ध चित्रपट परंपरेचा गौरव करणारा ६२ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या आयोजनाने होणाऱ्या या सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासोबतच चित्रपती कै. व्ही. शांताराम तसेच स्व. राज कपूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारांचेही वितरण करण्यात येणार आहे.

या सोहळ्यात चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, तर अभिनेते-दिग्दर्शक प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार, तर अभिनेत्री राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थितीत तर महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांची विशेष उपस्थिती या सोहळ्यास लाभणार आहे.

महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीतील कलावंत, तंत्रज्ञ आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणाऱ्या या पुरस्कार सोहळ्याला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गेली ६१ वर्षांहून अधिक काळ सातत्याने मराठी चित्रपटकर्मींच्या कलात्मक योगदानाचा गौरव करणारा हा पुरस्कार सोहळा एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. या पुरस्कार सोहळ्याची जय्यत तयारी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध चित्रपट आणि सांस्कृतिक परंपरेला आकार देणाऱ्या दिग्गजांच्या योगदानाचे स्मरण करत, नव्या पिढीतील कलाकारांना प्रेरणा देण्याचे काम या पुरस्कारांच्या माध्यमातून सातत्याने केले जाते. पुरस्कार सोहळा भव्य आणि दिमाखदार पद्धतीने पार पडावा, यासाठी संबंधित यंत्रणांकडून आवश्यक तयारी करण्यात येत आहे., असे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी सांगितले.

**पान १ वरून... नांदेड जिल्ह्यात कुणबी...**

नागरिकांनी आणलेल्या पुराव्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे, नवीन अर्ज स्वीकारणे , आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव आणि परिपुर्ण अर्ज भरण्यासाठी मदत व मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांना अत्यंत जलद गतीने प्रमाणपत्र वितरीत करणे अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येणार आहे.

दैनिक संनियंत्रण : शिबिरांमध्ये पारदर्शकता आणि वेग राखण्यासाठी उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांची जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही मोहीम शासनाच्या सर्वोच्च प्राधान्याची बाब असून सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी आपल्या स्तरावरून तात्काळ सूक्ष्म नियोजन करून या आदेशाची कडक अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी आपापल्या क्षेत्रातील महसूल मंडळाच्या शिबिराला भेट देऊन या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**तिर्थक्षेत्र काळेश्वर येथे...**

सतीश धनमणे स्वामी व राम धनमणे यांच्या मंत्रोच्चारात विधीवत महाअभिषेक संपन्न झाला. भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या हस्ते महापूजा व महाआरती करण्यात आली. सायंकाळी गोदावरी नदीच्या काठावर व काळेश्वर मंदिरात भव्य आरती पार पडली. सुविधा व महाप्रसाद भाविक भक्तांसाठी दुपारपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व उद्योजक पवन चाडावार यांच्या सौजन्याने आयोजित या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. महिनाभरातील गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात वाहनतळ (पार्किंग), पिण्याचे पाणी आणि दर्शन रांगांची योग्य सोय करण्यात आली होती. विष्णुपूरी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सरपंच संध्या विलास हंबर्डे, उपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे, सरपंच प्रतिनिधी राजू हंबर्डे, उपसरपंच प्रतिनिधी विश्वनाथ हंबर्डे आणि ग्रामपंचायत सदस्यांनी दर्शन घेऊन विश्वस्त समितीला सहकार्य केले. याप्रसंगी राजेंजी महाराज, उद्धव हंबर्डे, जयसिंग हंबर्डे, संतोष हंबर्डे, रामचंद्र शेबोले, मारोती विष्णुपूरीकर, शिवाजी चांदणे, त्र्यंबक आव्हाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी दर्शन घेतले.

**धनगर एसटी आरक्षणासाठी...**

उच्चस्तरीय बैठक घेऊन कालमर्यादेसह कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणीही करण्यात आली. आंदोलनात माजी जि.प. सदस्य माणिकराव लोहगावे, महेंद्र देमगुंडे, बबन वाघमारे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, भगवान हाके, ॲड. जगदीश हाके, ॲड. सोपान देवकत्ते, प्रदीप सरोदे, शिवकांत मैलारे आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# आज मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने अपेक्षित जोर धरलेला नाही. अनेक भागांमध्ये पावसाने दडी मारल्याने पिकांवर त्याचा थेट परिणाम झाला असून, काही ठिकाणी पाण्याअभावी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बळीराजाच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या असून, दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांसाठी काहीसा दिलासा देणारा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## डिग्री हरवली

माझी अश्विनी श्यामसुंदर चुनुकवार या नावाची बी.ई.सिव्हील पासची डिग्री गुरूजी चौक ते छत्रपती चौक प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**अश्विनी श्यामसुंदर चुनुकवार**
**रा. देवराव बापु नगर, वाडी (बु.) घर नं.५२, पुर्णा रोड गुरूजी चौक नांदेड**

र. जि.NND/RSR/(0)814/2024 जा. क्रं. SUCCSLN/२०२६-२७

## दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

# शिवालय अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि नांदेड,

**मुख्य कार्यालयः- नवीन मोंढा मार्केट कमिटीच्या मागे अजय ट्रेडिंगच्यावर ता. जि. नांदेड**

**प्रति,**
**अध्यक्ष्या,**
**सौ. संध्याताई बालाजीराव कल्याणकर.**

संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासद बंधू भगिणींना विनंती पूर्वक कळविण्यात येते की, शिवालय अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि नांदेड. आपल्या संस्थेची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २४/०९/२०२६ रोजी वार गुरुवार ठिक दुपारी ०२.०० वाजता संस्थेच्या अध्यक्षा सौ. संध्याताई बालाजी कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन मोंढा मार्केट कमिटीच्या मागे अजय ट्रेडिंगच्यावर ता, जि. नांदेड येथे घेण्यात येणार असून सदरील सभेत खालील विषयावर सभा घेवून निर्णय घेण्यात येणार आहे. तरी आपण सभेस वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

**सभेपुढील विषयः -**

१. मागील सभेचे इतिवृतान्त वाचून कायम करणे बाबत. २. दिनांक ३१/०३/२०२६ चे जमा खर्च पत्रक, नफा तोटा व ताळेबंद पत्रक वाचून कायम करणे. ३. सन २०२५-२६ साली झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत. ४. सन २०२६-२७ सालात अंदाज पत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे. ५. सन २०२५-२६ सालासाठी खर्चाचे अंदाज पत्रकास मंजूरी देणे. ६. सन २०२५-२६ साली या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे. ७. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे बाबत. ८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय. स्वाक्षरीत

**व्यवस्थापक**
**श्री. जधाव फकिरा भिकाजी**

दिनांकः २४/०९ /२०२६ स्थळ :- नांदेड शिवालय अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि नांदेड.

**विशेष सुचनाः** १) पोट नियमा नूसार सभा तहकुब झाल्यास सदर स्थगित सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी नियोजित वेळेवर अर्ध्या तासाने घेण्यात येईल. २) ज्या सभासदांना संस्थेच्या चांगल्या कामाबद्दल सूचना करावयाच्या किंवा अडी अडचणी असतील त्यांनी दिनांक १६/०९/२०२६ पर्यंत सायं ५.०० वाजेपर्यंत लेखी स्वरूपात मिळतील असे पाठवावे. त्यानंतर आलेल्या किंवा आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार केला जाणार नाही.

## टी.सी. हरवली

माझी प्रियंका माधवराव कांबळे या नावाची इयत्ता ९ वी पासची टी. सी. चिखली ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता-प्रियंका माधवराव कांबळे मु. पो. चिखली, ता. कंधार, जि. नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी विशाल आनंदा सुर्यवंशी या नावाची दहावी पासची टी.सी. तळणी ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.-

**– संपर्क पत्ता –**
**विशाल आनंदा सुर्यवंशी रा. तळणी ता.जि. नांदेड**

## घर विकणे आहे

बिलोली शहरातील अमोल नगर/ गांधीनगर येथील सर्व सोयी सुविधा असलेले घर योग्य भाव आल्यास विकणे आहे.

घराची वैशिष्ट्ये: उत्तम परिसर, राहण्यासाठी अत्यंत अनुकूल वातावरण, पाणी आणि विजेची योग्य सोय, मोकळी हवा आणि शांत वातावरण.

**:: पत्ता ::**
**अंतर भरती शाळेजवळ अमोल नगर,/ गांधीनगर, बिलोली, जिल्हा नांदेड.**
**संपर्क साधावा: ७०२८१०७९७१, ९०९६२५४१४६**

## • पाहिजेत •

**महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था (MSACS) मुंबई व धन्वंतरी सेवाभावी संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने संचालित एम.एस.एम. प्रकल्प नांदेड या प्रकल्पअंतर्गत ऑगस्ट-2026 ते मार्च- 2027 या कालावधीकरिता खालील पदे भरणे आहेत.**

| अ क्र. | पदाचे नाव | संख्या | शैक्षणिक पात्रता/अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| 01 | Accountant / अकाउंटन्ट कम डेटा एन्ट्री ऑपरेटर | 01 | B.Com/M.Com. कॉम्पुटर वर कामाचा किमान 01/02 वर्षाचा अनुभव असावा | 16000/- + 600/- TA |

**वरील पात्र उमेदवारांनी मूळ कागदपत्रासह संस्थेचे कार्यालय उमा बिल्डिंग बी. एम .इलेक्ट्रिक शो रूम जवळ बाफना रोड हिंगोली गेट जवळ नांदेड-431601 येथे दिनांक- 09/09/2026 रोज बुधवार रोजी 11 ते 3 या वेळेत शैक्षणिक मूळ कागदपत्र व सर्व कागदपत्रांची एक झेरॉक्स प्रत ,पासपोर्ट फोटो घेऊन स्वखर्चाने हजर राहावे.**

**संपर्क- 7028208680 / 8421755695**

**स्वाक्षरीत**
**प्रकल्प संचालक**
**सचिव धन्वंतरी सेवाभावी संस्था नांदेड**

## Change In Name

My Old Name is **KASHIF RAZA KHAN** which now I am changing as New Name **KASHIF RAZA KHAN HYDER RAZA KHAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 14 Chaitanya Nagar, B & C Colony, Nanded 431605 Maharashtra**
**Mo.No. 8857921435**

## Change In Name

My Old Name is **SHUMAILA TAZEEM** which now I am changing as New Name **SHUMAILA TAZAIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -**
**H.No.9-1-304, Near Diwani Bowdi, Mominpura, Karbla Road, Nanded**
**Mo.No. 7776887444**

## Change In Name

My Old Name is **S.K FAROOQ SHAIKH FAROOQUE** which now I am changing as New Name **SHAIKH FAROOQ SHAIKH FAROOQUE.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No.9-1-304, Near Diwani Bowdi, Mominpura, Karbla Road, Nanded**
**Mo.No. 7776887444**

## Change In Name

My Old Name is **RAFATUNNISA** which now I am changing as New Name **RAFATUNNISA BEGUM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -**
**H.No.9-1-304, Near Diwani Bowdi, Mominpura, Karbla Road, Nanded**
**Mo.No. 7776887444**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED SALEEM SHAIKH** which now I am changing as New Name **MOHAMMED SALEEM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -**
**H.No. 13, Asra Nagar, Airport Road, Near Railway Division, Nanded**
**Mo.No. 9561403366**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, शिवशंकर धोंडीबा खांडरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (डी-१३८/५) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (२३४१) साईज पूर्व-पश्चिम १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. १४२, पश्चिमेस : भोकर - रस्ता, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. प्लॉट नं. १४४.

शिवानंद लक्ष्मण हुल्लेवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नरेंद्र बालाजी मगरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४०१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (१३८) मालमत्ता नं. (सी-४७१) नवीन वार्ड क्र. (१०) नवीन मालमत्ता नं. (७९१) साईज पूर्व-पश्चिम ६.६ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : ६ मीटरचा रस्ता, पश्चिमेस : भोकर - प्लॉट नं. १३७, दक्षिणेस : ६ मीटरचा रस्ता, उत्तरेस : अतुलकुमार मुनेश्वर.

तारामती राजाराम शिंगनकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वनिताबाई इंदल राठोड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४६), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (..) मालमत्ता नं. (सी-८३३) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (४०४०) साईज पूर्व-पश्चिम १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : गट नं. ४ चा भाग, पश्चिमेस : भोकर - ६.१० मीटरचा रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.२, उत्तरेस : प्लॉट नं. गायरान.

मारोती गणपतराव गोरटकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, तुळशीराम नामदेव चिंताकुटे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०४) मालमत्ता नं. (डी-८४२/५२) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (४०११/५२) साईज पूर्व-पश्चिम १४.३२ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : भोकर - गट नं. ५२२, दक्षिणेस : प्लॉट नं.३, उत्तरेस : प्लॉट नं. प्लॉट नं.५.

गणेश नामदेव चिंताकुटे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सतीष नानासाहेब चिंताकुटे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०३) मालमत्ता नं. (डी-८४२/५१) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (४०११/५१) साईज पूर्व-पश्चिम १४.३२ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुट रस्ता, पश्चिमेस : भोकर - गट नं. ५२२, दक्षिणेस : प्लॉट नं. २, उत्तरेस : प्लॉट नं. प्लॉट नं. ४.

गणेश नामदेव चिंताकुटे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अब्दुल इलियास अब्दुल सत्तार फारुखी यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५९७), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (..) मालमत्ता नं. (ए/१४१) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (१६९) साईज पूर्व-पश्चिम ५१ फुट, दक्षिण- १६ फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : भोकर - भगवानराव देशमुख, दक्षिणेस : प्लॉट नं. १२१, उत्तरेस : प्लॉट नं. रस्ता.

मोहम्मद तारोद्दीन मोहम्मद मुनीरोद्दिन यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# आरक्षण उपवर्गीकरणासाठी १३ सप्टेंबरला नांदेडमध्ये जनआक्रोश महामोर्चा; मातंग समाजासह ४४ वंचित जाती रस्त्यावर उतरणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी १३ सप्टेंबर रोजी नांदेडमध्ये जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा निघणार आहे.

स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला नसल्याने उपवर्गीकरणाची मागणी जोर धरत आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यांना उपवर्गीकरणाचा अधिकार दिल्यानंतर पंजाब, हरियाणा, तेलंगणा, कर्नाटकसह अनेक राज्यांनी अंमलबजावणी सुरू केली आहे, मात्र महाराष्ट्रात निर्णय प्रलंबित आहे.

या मोर्चासाठी सकल मातंग समाज व लाभवंचित घटकांची समिती स्थापन झाली असून मुखेड, माहूर, हदगाव, देगलूर, नायगावसह १० ठिकाणी जनसंवाद बैठका घेऊन जनजागृती सुरू आहे. राज्यातील ४४ अतिमागास जातींचा 'अ' गट आणि १५ प्रगत जातींचा 'ब' गट करून मागासलेपणानुसार टक्केवारी निश्चित करावी, ही प्रमुख मागणी आहे. पत्रकार परिषदेला आ. जितेश अंतापूरकर, माजी आ. अविनाश घाटे, मारुती वाडेकर, केशव शेकापूरकर, गणेश तादलापूरकर, लालबा घाटे, सतीश कावडे आदी उपस्थित होते.



**नांदेड–** भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने हक्काचे शहर मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत शहरातील प्रभाग क्र. १६, १७, २८ मधील समस्या काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफार यांच्या नेतृत्वात व वजिराबाद ब्लॉक अध्यक्ष दीपकसिंघ हुजुरीया यांच्यावतीने त्या समस्या सोडविण्यात याव्यात तसेच भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहरसिंघ यांचा पुतळा यात्री निवाससमोर उभारण्यात यावा या मागणीचे निवेदन आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना देण्यात आले. यावेळी अब्दुल गफार, प्रशांत इंगोले, सुरेश हटकर, दीपकसिंघ हुजूरीया, गगन यादव आदी उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**




**नांदेड–** भोई समाजाच्या विविध मागण्यांसदर्भात सकल भोई समाज व भोई समाज महासंघाच्यावतीने महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत एल्गार जनआक्रोश महामोर्चा काढण्यात आला. यावेळी भोई समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**

## बाळापूरमधील नगरपालिकेच्या जमिनीवर बेकायदा फेरफार; चौकशी करण्याचे तहसीलदारांचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** धर्माबाद तालुक्यातील बाळापूर येथील नगरपालिका धर्माबादच्या मालकीच्या स.नं. ५९६/१ या जमिनीवर झालेल्या अनियमित फेरफार नोंदी आणि बेकायदेशीर हस्तांतरण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश तहसीलदार धर्माबाद यांनी मंडळ अधिकारी यांना दिले आहेत. परंतु या प्रकरणात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शांत असल्याने त्यांची मूकसंमती आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या संदर्भात उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांच्या पत्र क्र. २०२६/जमाबंदी शाखा/कावी-१९७ दि. २१ ऑगस्ट २०२६ (प्राप्त दि. ३ सप्टेंबर २०२६) नुसार शेख एजाज शेख बाबू, रा. हनुमान सोसायटी, धनेगाव नांदेड यांनी तक्रार दाखल केली होती. तक्रारीत स. नं. ५९६/१ या नगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीवर बेकायदेशीर फेरफार घेऊन महसूल अभिलेखात गंभीर अनियमितता करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने प्रचलित शासन आदेश आणि न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले होते.

## प्रलंबित वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा करणार -आ. श्रीजया चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महत्त्वाचे असलेले 'वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ' तातडीने कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही आमदार श्रीजया चव्हाण यांनी दिली. नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या शिष्टमंडळाने नुकतीच आमदार श्रीजया चव्हाण यांची भेट घेऊन राज्य सरकारकडे प्रलंबित असलेल्या वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ विषयी सविस्तर चर्चा केली.

या बैठकीला पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा 'सत्यप्रभा'चे संपादक संतोष पांडागळे व राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने बालाजी पवार यांनी आमदार श्रीजया चव्हाण यांना वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ कार्यान्वित करण्यासाठी आजवर झालेल्या कामांची सविस्तर माहिती दिली.



तेंव्हा वृत्तपत्र विक्रेता महामंडळाची तातडीने अंमलबजावणी व्हावी यासाठी आपण शासनाकडे योग्य तो पाठपुरावा करावा, अशी आग्रही मागणी यावेळी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने बालाजी पवार यांनी केली.

शिष्टमंडळाच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करत आमदार श्रीजया चव्हाण म्हणाल्या की, वृत्तपत्र विक्रेते हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा आणि असंघटित घटक आहेत. त्यांच्या कल्याणासाठी हे महामंडळ लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे आहे. यासाठी लवकरच संबंधित मंत्री आणि असंघटित कामगार आयुक्त यांच्यासोबत चर्चा केली जाईल. तसेच मंत्रालयात महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक आयोजित करून या महामंडळाच्या अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.तसेच येणाऱ्या अधिवेशनात सुध्दा प्रश्न उपस्थित करणार असेही यावेळी आमदार श्रीजया चव्हाण यांनी सांगितले.

या बैठकीला नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, सचिव गणेश वडगावकर, उपाध्यक्ष सतिश कदम, बालाजी चंदेल, सत्यनारायण देवरकोंडा, बालाजी सुताडे, गणेश पवार यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# भोकरमध्ये भूमाफीयांच्या जाचाला कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

### मयताच्या आईने दिली भोकर पोलिसांत तक्रार इनामी जमीन घोटाळा प्रकरणी एकाचा गेला बळी

**भोकर (प्रतिनिधी)** –येथील तहसील कार्यालयासमोर असलेल्या हॉटेल कणका भवनचे मालक व्यंकटेश सायागौड भुरेवार (५३) यांनी भूमाफियांच्या जाचाला कंटाळून गोवर्धनघाट नांदेड येथे गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना ४ सप्टेंबर २०२६ रोजी घडली. याप्रकरणी मयताच्या आईने भोकर पोलिसात तक्रार दाखल केली. मात्र अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही.

पोलीस निरीक्षक भोकर यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, माझ्या मुलाकडे मागील ७० वर्षांपासून सदर इमारत असून, त्या ठिकाणी कणका भवन बार चालत होते. सदर इमारत नगर परिषदेला नमुना क्रमांक ४३ ला नोंद असून, पीआर कार्ड देखील आहे. मागील महिनाभरापासून भोकर येथील मोहम्मद हारून मोहम्मद युसूफ, रमीजोद्दीन तकियोद्दीन इनामदार, सिजू खान सादत खान, अहमदखान अल्लारखान इनामदार, अजबाज खान फतेखान या सर्वांनी मिळून म्हटले की, ही जागा आमची आहे. इनामी आहे, तू इथून निघून जा, दुकान खाली कर नाही तर जागा विकून जा. माझ्या मुलास धमकी देऊन मानसिक त्रास दिला व ३ कोटींची जागा १ कोटी दहा लाख रुपयांमध्ये दबाव टाकून धोक्याने सौदा चिठ्ठी करून घेतली. तेव्हापासून माझा मुलगा मानसिक त्रासामध्ये होता. या जाचाला कंटाळून माझ्या मुलाने ५ सप्टेंबर रोजी गोवर्धनघाट नांदेड येथे गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणातील व्यक्ती हे गुंड प्रवृत्तीचे असून, भू-माफिया आहेत. वरील पाच आरोपींनी मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केले. या सर्व आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार मयताची आई सत्यअक्का सायागौड भुरेवार व येथील गौड व्यंकटेश भुरेवार यांनी भोकर पोलिसात केली आहे. भोकर पोलिसात मात्र याप्रकरणी कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

भोकर शहरात इनामी जमीन मोठ्या प्रमाणात असून, सदर जमीन विक्री खरेदी करता येत नाही. मात्र शहरात अनेक ठिकाणी जमीन विक्री करून रजिस्ट्री करून नगरपालिकेला नोंद घेऊन अनधिकृत कारभार करण्यात आला. या प्रकरणाची चौकशी केल्यास मोठा घोटाळा उघडकीस येऊ शकतो. काही ठिकाणी अनधिकृत इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. रिकाम्या दिसणाऱ्या जागा मात्र अनेकांनी अनधिकृतरित्या ताब्यात घेऊन विक्री केल्याचे समजते. सदर जमिनीची रजिस्ट्री कशी काय होऊ शकते. नगरपालिकेला नोंदही करण्यात आली. गुंठेवारी, लेआउटसुद्धा करण्यात आले. या प्रकरणाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### गणपती व महालक्ष्मी उत्सवानिमित्त नांदेड-हडपसर-नांदेड दरम्यान विशेष रेल्वेगाडीची एक फेरी

**नांदेड (प्रतिनिधी) –** गणपती व महालक्ष्मी उत्सवानिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातर्फे गाडी क्रमांक ०७६०७/०७६०८ नांदेड-हडपसर-नांदेड ट्रेन ओन डिमांड विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०७६०७ नांदेड-हडपसर विशेष गाडी रविवार दि. २० सप्टेंबर रोजी रात्री २१ वाजता नांदेड येथून सुटून पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, लासूर, नगरसूल, अंकाई, अहिल्यानगर व दौंड कॉर्ड लाईन मार्गे पुढे जाऊन हडपसर येथे दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी ०९.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७६०८ हडपसर-नांदेड विशेष गाडी सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ सकाळी ११ वाजता हडपसर येथून सुटून दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, अंकाई, नगरसूल, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, परभणी, पूर्णा मार्गे नांदेड येथे दुसऱ्या दिवशी मंगळवारी रात्री ००.३५ वाजता पोहोचेल.

# भक्ती गीतांनी माहूरगड दुमदुमला; २५० हून अधिक योगसाधकांची योगिक सहल उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड योग सेवा समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक योगिक सहल श्रीक्षेत्र माहूरगड येथे उत्साहात पार पडली. अडीचशेहून अधिक योगसाधकांच्या सहभागाने हा उपक्रम भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

योगाचार्य, नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. ६ सप्टेंबर रोजी पहाटे ६ वाजता चांदोजी पावडे मंगल कार्यालय, नांदेड येथून उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ५ बसेसमधून ही सहल माहूरकडे रवाना झाली. सर्वप्रथम हिवरा संगम (ता. पुसद, जि. यवतमाळ) येथील श्री एकविरा देवी संस्थान



येथे योगसाधकांनी दर्शन घेऊन वनभोजन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य तथा संस्थानचे विश्वस्त साहेबराव पाटील यांनी योगाचार्य सोनटक्के गुरुजींचे स्वागत केले.

त्यानंतर सहल श्रीक्षेत्र माहूरगड येथे पोहोचली. पायथ्यापासून ते गडावरपर्यंत योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी यांनी उलट दिशेने पायऱ्या चढत गड सर केला, हे विशेष आकर्षण ठरले. गडावर गुरुजींसह प्रसिद्ध गायक प्रा. विलास गारोळे, डॉ. शिवराज शिंदे, कृष्णा चौधरी, अतुल राजे, प्रा. विनोद राणे यांनी देवीचा गोंधळ, भारुड आणि भक्तीगीते सादर करून संपूर्ण माहूरगड दुमदुमून टाकला. तबल्यावर समाधान राऊत तर ऑर्गनवर अजय शेवाळे यांनी साथ दिली. निवेदन मुरलीधर हंबर्डे यांनी केले.

त्यानंतर सर्वांनी दत्तशिखर येथील श्री दत्तगुरूंचे दर्शन घेतले आणि श्री स्वामी समर्थ अन्नछत्रात महाप्रसाद घेतला. याच ठिकाणी संगीत भक्तीमय वातावरणात रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला. योगामुळे प्रथमच आम्ही माहूरगड चढण्याचे धाडस केले, अशा भावना ७० वर्षांवरील अनेक ज्येष्ठ योगसाधकांनी व्यक्त केल्या. सहल शिस्तबद्ध, उत्साही आणि आनंदी वातावरणात पार पडली.

## मनपात राजे उमाजी नाईक यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** –देशाचे आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये त्यांच्या प्रतिमेस महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

राजे उमाजी नाईक हे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील पहिले आद्यक्रांतिकारक होते, ज्यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरापूर्वीच महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध शक्तिशाली सशस्त्र बंड पुकारले होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून रामोशी समाज आणि स्थानिक जनतेला संघटित केले आणि सुमारे १४ वर्षे इंग्रज सत्तेला सळो की पळो करून सोडले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त गंगाधर ईरलोड, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, उपायुक्त नितीन गाढवे, मुख्य लेखा परिक्षक आनंद ऐनवाड, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, वरिष्ठ लिपीक शुभांगी चौधरी, लिपीक श्रध्दा बुरसे यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी 1 लक्ष रूपये आर्थिक मदत द्या –संभाजी ब्रिगेड

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करून योग्य त्या उपाययोजनेसह हेक्टरी एक लक्ष रूपये आर्थिक मदत द्या, असे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आले.

नांदेड जिल्ह्यात दरवर्षीच्या तुलनेत १४० मिलीमीटर पाऊस कमी झाला आहे. गतवर्षी आज रोजीपर्यंत ८२६ मिलिमीटर पाऊस झाला होता. यावर्षी मात्र ५२१ मिलिमीटर पावसाची नोंद आहे, म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी ३०५ मिलीमीटर पाऊस कमी झाला आहे. त्यामुळे सोयाबीन, कापूस व ईतर खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरवातीला काही भागात समाधानकारक पाऊस झाला. मात्र गेल्या काही दिवसांपासून पाऊस न पडल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला




आहे. सध्याचे दिवस हे सोयाबीनमध्ये शेंगा भरण्याचे व कापसाला बोंड येण्याचे आहेत. या दिवसात जमिनीत ओलावा असणे गरजेचे होते, परंतु कडक ऊन पडत आहे. भारतीय हवामान विभागाने गेल्या महिन्यात दोन वेळा यलो अलर्ट दिला होता. मात्र अलर्टच्या काळात अपेक्षित पाऊस झाला नाही. पाऊस वेळेवर पडत नसल्याने सोयाबीन कापसासह ईतर पिके वाळत आहेत. त्यामुळे सरकारने नांदेड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करावा तसेच योग्य त्या उपाययोजनेसह हेक्टरी एक लक्ष रूपये आर्थिक मदत करावी अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना देण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष प्रदीप गुब्रे, किरण वानखेडे, कुंडलिक शिंदे, रमेश बोकारे, नितीन कोकाटे, दिलीप दळवी, प्रदीप इंगोले, बालाजी पाटील, प्रेमानंद खिलारे, सुनील पाटील उपस्थित होते.

## नांदेड जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटना; शेतात विद्युत शॉकने तरुणाचा मृत्यू तर अवैध रेती वाहतूक करणारे दोघे जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटना घडल्या असून, भोकर तालुक्यात शेतात विद्युत शॉक लागल्याने तरुणाचा मृत्यू तर नांदेड शहरातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**शेतात विद्युत प्रवाह सोडल्याने तरुणाचा मृत्यू**

दिनांक ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता रावणगाव शेतशिवार (ता. भोकर) येथे आनंद बंडू चंद्रे (वय ३०, रा. रावणगाव) हा शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी जात असताना शेताच्या पायवाटेवर आरोपी गंगाधर ग्यानोबा चंद्रे (वय ७२) याने तारेला लाईटचे कनेक्शन दिल्याने विजेचा जोरदार धक्का लागून त्याचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताचे वडील बंडू ग्यानोबा चंद्रे (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे भोकर येथे गु.र.नं. ४७०/२०२६ कलम १०५ भारतीय न्याय संहिता अन्वये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोउपनि झाडे हे करीत आहेत.

**२० लाखांच्या हायवासह अवैध रेती जप्त –विमानतळ पोलीस ठाणे**

दि. ६ सप्टेंबर रोजी रात्री एकच्या सुमारास सांगवी आसना ब्रिज रोड, नांदेड येथे दोघे विनापरवाना अवैध रेतीची चोरटी वाहतूक करताना मिळून आले. आरोपी शुभम माधव दागंट (वय १९, रा. बोरगडवाडी, अर्धापूर) व अवधूत दौलतराव गोविंदवाड (वय ३८, रा. ब्राह्मणवाडा, नांदेड) हे हायवा क्र. MH-14-LL-3984 (किंमत २० लाख) मध्ये ५ ब्रास रेती (किंमत २५ हजार रुपये) विक्रीच्या उद्देशाने नेत होते.

पोलीस हवालदार बालाप्रसाद बेंडे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२६/२०२६ कलम ३०३(२), ३(५) BNS सह कलम ४८(७) (८) महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला असून, तपास बेंडे करीत आहेत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com